# रोजगार हमी योजना समिती

## (२०१०-२०११)

( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

## सातवा अहवाल

( धुळे जिल्ह्याच्या संबंधात )

**( अहवाल दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१०.

# रोजगार हमी योजना समिती

# (२०१०-२०११)

( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

# सातवा अहवाल

( धुळे जिल्ह्याच्या संबंधात )

**( अहवाल दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)**

## रोजगार हमी योजना समिती
## (सन २०१०-२०११)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. वीरेंद्र जगताप, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(३) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(४) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.

(५) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.

(६) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.

(७) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.

(८) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.

(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.

(११) श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

(१२) श्री. राजीव देशमुख, वि.स.स.

(१३) श्री. दादाराव केचे, वि.स.स.

(१४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(१५) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.

(१६) श्री. शिवाजी कर्डिले, वि.स.स.

(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

(१८) श्री. संजय राठोड, वि.स.स.

(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(२०) श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.

(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

* (२२) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(२४) श्री. केशवराव मानकर, वि.प.स.

(२५) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अ. ना. कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव

(३) श्री. नंदलाल काले, अवर सचिव (विधी)

(४) श्री. उमेश शिंदे, कक्ष अधिकारी

---

* टीप : श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै, २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांची दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० रोजी मा.सभापतींनी सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.

## रोजगार हमी योजना समिति
## ( २००८-२००९ )

**समिती प्रमुख :**

(१) श्री. बंडूभाऊ सावरबांधे, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. मधुकरराव चव्हाण, वि.स.स.

(३) श्रीमती रंजना कुल, वि.स.स.

(४) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.

(५) श्री. उदय सामंत, वि.स.स.

(६) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(७) श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.स.स.

(८) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

(९) श्री. हाफीजभाई धत्तुरे, वि.स.स.

(१०) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(११) श्री. अरविंद चव्हाण, वि.स.स.

(१२) श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

(१३) श्री. काशिनाथ मेंगाळ, वि.स.स.

(१४) श्री. दयानंद गायकवाड, वि.स.स.

(१५) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.

(१६) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

(१७) ॲड. अजित गोगटे, वि.स.स.

(१८) श्री. सांडू पाटील लोखंडे, वि.स.स.

(१९) श्री. विठ्ठल गायकवाड, वि.स.स.

(२०) डॉ. बी.एस.पाटील, वि.स.स.

(२१) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

*(२२) श्री. दिलीप देशमुख, वि.प.स.

(२३) श्री. भास्कर जाधव, वि.प.स.

(२४) श्री. सुरेश जेथलिया, वि.प.स.

(२५) श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अ. ना. कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. अ. मा. शिंदेकर, सचिव

(३) श्री. यु. के. चव्हाण, उपसचिव

(४) श्री. आर. आर. काठे, समिती अधिकारी

(५) श्री. आर. के. खैरे, कक्ष अधिकारी

---

* श्री.दिलीप देशमुख, वि.प.स. यांची दिनांक २ मार्च, २००९ रोजी मंत्रीपदावर नियुक्ती झाल्यामुळे पद रिक्त.

## रोजगार हमी योजना समिती
## ( २००७-२००८)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. संजय देवतळे, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव कर्डिले, वि.स.स.

(३) श्रीमती रंजना कुल, वि.स.स.

(४) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.

(५) श्री. उदय सामंत, वि.स.स.

(६) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(७) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

(८) श्री. मधुकरराव चव्हाण, वि.स.स.

(९) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

(१०) श्री. संजय देशमुख, वि.स.स.

(११) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(१२) श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

(१३) श्री. शिवराम दळवी, वि.स.स.

(१४) श्री. देवेंद्र साटम, वि.स.स.

(१५) श्री. आर. एम. वाणी, वि.स.स.

(१६) श्री. अनिल राठोड, वि.स.स.

(१७) ॲड. अजित गोगटे, वि.स.स.

(१८) श्री. सांडू पाटील लोखंडे, वि.स.स.

(१९) श्री. विठ्ठल गायकवाड, वि.स.स.

(२०) डॉ. बी. एस.पाटील, वि.स.स.

* (२१) श्री. धोंडीराम राठोड, वि.प.स.

(२२) श्री. जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स.

* (२३) श्री. वसंतराव बळवंतराव चव्हाण, वि.प.स.

(२४) श्री. सुरेश जेथलिया, वि.प.स.

(२५) श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अ. ना. कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. अ. मा. शिंदेकर, सचिव

(३) श्री. यु. के. चव्हाण, उपसचिव

(४) श्री. एम. एस. वाघमारे, समिती अधिकारी

(५) श्री. एन. आर. थिटे, कक्ष अधिकारी

* श्री. धोंडीराम राठोड, वि.प.स. व श्री. वसंतराव बळवंतराव चव्हाण, वि.प.स. यांची दिनांक २० फेब्रुवारी, २००८ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पदे रिक्त.

## अनुक्रमणिका


| अनु. क्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | प्रस्तावना | (नऊ) |
| १. | मजुरीचे वाटप | १ |
| २. | अपूर्ण कामे | ४ |
| ३. | सुधारीत अंदाजपत्रक | ७ |
| ४. | गैरव्यवहाराची प्रकरणे | ८ |
| ५. | जवाहर विहिर कार्यक्रम | १० |
| ६. | भूसंपादनाचा मोबदला | ११ |
| | परिशिष्ट : | .. |
| | एक - अपूर्ण कामे. | १३ |
| | दोन - गैरव्यवहारची प्रकरणे. | ४३ |
| | तीन - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त. | ६३ |

## प्रस्तावना -

मी, रोजगार हमी योजना "समितीचा प्रमुख" या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा सातवा अहवाल सादर करीत आहे.

समिती, मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१० व २६ फेब्रुवारी, २०१० रोजी सन २०१०-२०११ या वर्षासाठी गठीत केली. पुर्वीच्या समितीने दिनांक १५ व १६ जानेवारी, २००९ रोजी धुळे जिल्ह्यास भेट दिली होती. त्यावेळी झालेल्या जिल्हा बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामांना प्रत्यक्ष भेटी देऊन केलेल्या पाहणीत आढळून आलेल्या त्रुटी तसेच रोहयोअंतर्गत कामे करणा-या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणिवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्ह्यातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांची पाहणी करतांना समितीसमोर आलेली प्रकरणे व जिल्हा बैठकीमध्ये कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिका-यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पुर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करुन ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पुर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१० रोजी प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा भेटीच्या व बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल समितीचे सर्व सदस्य, धुळे जिल्हयातील लोकप्रतिनिधी, धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, धुळे व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरुन समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने सदर अहवाल दिनांक ९ डिसेंबर, २०१० रोजी विचारात घेतला व संमत केला.

**प्रा. वीरेंद्र जगताप,**
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

नागपूर :
दिनांक : ९ डिसेंबर, २०१०.

## (१) मजुरीचे वाटप

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक १५ व १६ जानेवारी, २००९ रोजी झालेल्या धुळे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेनुसार सन २००६-२००७ व सन २००७-२००८ या वर्षात खालील यंत्रणांकडून एकूण हजेरीपटावरील मजुरीचे वाटप करण्यास मोठ्या प्रमाणात विलंब झालेला आहे. असे समितीच्या निदर्शनास आले.

| अ.क्र. | कार्यान्वयीन यंत्रणेचे नाव | मजुरी वाटपास विलंब | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दोन आठवड्यांपेक्षा जास्त | तीन आठवड्यांपेक्षा जास्त | चार आठवड्यांपेक्षा जास्त | पाच आठवड्यांपेक्षा जास्त |
| (१) | (२) | (३) | | | |
| १ | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) विभाग, धुळे. | २३ | २० | ५ | .. |
| २ | जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, धुळे. | १२ | २० | ४ | .. |
| ३ | कार्यकारी अभियंता, रोहयो (सा.बां.) विभाग, धुळे. | ०३ | ०२ | ३ | .. |
| ४ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धुळे. | १० | ०६ | १ | .. |
| ५ | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, (स्था.स्तर) विभाग, धुळे. | १३ | १२ | ३ | .. |

यंत्रणांकडून मजुरीचे वाटप होण्यास झालेल्या विलंबाबाबत समितीने विचारणा केली की, सन २००५-०६ व २००६-०७ मध्ये का.अ.ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, का.अ. रोहयो (सा.बां.), का.अ. बांधकाम, जि.प. या यंत्रणांनी २ आठवड्यांपेक्षा जास्त विलंबाने मजुरी अदा करण्याची कारणे काय ? का.अ.ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग यांच्याकडे २३ हजेरीपटांच्या बाबतीत २ आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. २० हजेरीपटांच्या बाबतीत ३ आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. ५ हजेरीपटांच्या बाबतीत ४ आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. मजुरी वाटपास एवढा विलंब लागण्याची कारणे काय आहेत ? त्यावर समितीला माहिती देण्यात आली की, काम पूर्ण झाल्यानंतर शाखा अभियंता साईटवर येऊन मोजमापे घेऊन एम.बी. रेकॉर्ड करुन सबडिव्हीजनला देतात. त्यामध्ये दोन तीन दिवस जातात. त्यानंतर त्या विभागाची सर्व माहिती संकलित करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवली जाते. नियमानुसार वेळेत मजुरी वाटप करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. त्यावर जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी यांच्याकडे मजुरी वाटपास विलंब लागण्याची काय कारणे आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता कृषी विभागाच्या मागणीप्रमाणे १७-१-२००६ ला अनुदान प्राप्त झाले आणि ३०-१-२००६ रोजी मजुरांना मजुरी वाटप करण्यात आली अशी माहिती दिली. त्यावर १२ हजेरीपटांच्या बाबतीत २ आठवड्यांपेक्षा जास्त, २० हजेरीपटांच्या बाबतीत ३ आठवड्यांपेक्षा जास्त आणि ४ हजेरीपटांच्या बाबतीत ४ आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. त्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली त्यावर ४ मस्टर आहेत ते डिसेंबर महिन्याचे आहेत. २२ डिसेंबरला म्हणजे क्वार्टरच्या शेवटी मागणी कळविल्यामुळे त्याची रक्कम जानेवारी महिन्यामध्ये आली. वेळेवर मागणी न केल्यामुळे विलंब झालेला आहे. २२ डिसेंबरला मागणी केली. ते क्वार्टर डिसेंबर अखेर संपते. चौथे क्वार्टर जानेवारीपासून सुरु होते. ही तिसऱ्या क्वार्टरची मागणी होती. त्याचे अनुदान १७ जानेवारीला प्राप्त झाले. त्यानंतर ३० जानेवारीला अनुदान अदा करण्यात आलेले आहे. अशी माहिती देण्यात आली, त्यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि. प. धुळे यांच्याकडे मजुरी वाटपाच्या बाबतीत विलंब होण्याची काय कारणे आहेत ? अशी समितीने विचारणा केल्यावर एकूण ४० हजेरीपट होते. त्यापैकी १७ हजेरीपटांच्या संदर्भामध्ये मजुरी वाटपास विलंब झालेला आहे. यामध्ये चूक झालेली आहे हे मान्य आहे. यापुढे आम्ही दक्षता घेऊ अशी माहिती समितीला देण्यात आली.

यासंदर्भात दिनांक ४ ऑगस्ट, २०१० रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने मजुरी वाटपाच्या विलंबाबाबत विचारणा केली की, मजुरीचे वाटप पंधरा दिवसाच्या आत करणे आवश्यक असताना मजुरी वाटपामध्ये जो विलंब केला

त्याबाबत काय कारवाई केली ? त्यावर मजुरी वाटपास चार आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटाची एकूण संख्या १० असून त्यामध्ये तीन यंत्रणा आहेत. या १० हजेरीपटांपैकी कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर) यांच्याकडील ५ हजेरीपट आहेत. जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी यांच्याकडील ४ हजेरीपट आहेत आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जि.प. धुळे यांच्याकडील १ हजेरीपट आहे. माझ्या अगोदरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या तीनही यंत्रणांना कारणे दाखवा नोटीस दिलेली होती व त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन संबंधितांना सक्त ताकीद दिलेली आहे. शासनाचा दिनांक ९-१०-२००२ चा शासन निर्णय आहे. त्यामध्ये पाच आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करावी असे म्हटले आहे. या १० हजेरीपटांच्या बाबतीत ४ आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. त्याचे म्हणणे ऐकून घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक ९-१०-२००२ च्या शासन निर्णयाच्या आधारे त्यांना सक्त ताकीद दिलेली आहे. त्यावर समितीने विचारले की, एक-दोन हजेरीपट असते तर समजू शकलो असतो. १० हजेरीपटांच्या बाबतीत चार आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे. याबाबत सचिवांचे काय मत आहे ? त्यावर यामध्ये झालेला विलंब पाच आठवड्यांपेक्षा कमी असल्यामुळे सक्त ताकीद दिलेली आहे. यापुढे जास्त विलंब होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. अशी माहिती देण्यात आली. त्यावर दिनांक १५ व १६ जानेवारी, २००९ रोजी समितीने धुळे येथे जिल्हा बैठक घेतली. त्यावेळी दिलेल्या उत्तरांमध्ये दिनांक २१-६-२००९ रोजी सक्त ताकीद देण्यात आली आहे असे म्हटले आहे. मजुरी वाटपास चार आठवडे विलंब झाला त्याचा कालखंड कोणता होता ? अशी विचारणा केली, त्यावर कार्यकारी अभियंता, ल.पा. (स्थानिक स्तर) यांच्याकडील ५ हजेरीपट आहेत. त्यामध्ये सगळी कामे पाझर तलावाची आणि गावतलावाची आहेत. दिनांक २-९-२००५ ते दिनांक १५-९-२००५ या कालावधीतील १ लाख १८ हजार २८८ रुपये इतकी रक्कम द्यावयाची होती. संबंधित यंत्रणेने जिल्हाधिकाऱ्यांकडे दिनांक २६-९-२००५ रोजी पतमर्यादा मागितली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ६-१०-२००५ रोजी शासनाकडे मागणी केली होती. शासनाकडून दर तिमाहीला पैसे दिले जातात. दिनांक २-९-२००५ ते दिनांक १५-९-२००५ या कालावधीत केलेल्या कामाच्या संदर्भात विलंब झालेला आहे. त्यावर सप्टेंबर महिन्यापासून चार आठवडे विलंब झालेला आहे. त्याबाबतीत कोणतीही कारवाई केलेली नव्हती. जानेवारी, २००९ ला समितीने भेट दिल्यानंतर २००५ मधील मजुरी वाटपाच्या बाबतीत झालेल्या विलंबाबाबत दिनांक २१-६-२००९ रोजी सक्त ताकीद दिलेली आहे, हे योग्य आहे काय ? याबाबत सचिवांनी खुलासा करावा. अशी विचारणा करता हे योग्य नाही. मजुरी वेळेवर देणे आवश्यक आहे.समिती त्या ठिकाणी आल्यामुळे ही बाब लक्षात आली आणि त्यामुळे कारवाई झालेली आहे. समिती गेल्यानंतर त्यांनी सक्त ताकीद दिलेली आहे. त्याच्या आधी कारणे दाखवा नोटीस दिली असेल. त्यामध्ये एक-दोन महिने लागले असतील. कारण कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर निवेदन सादर करावयाचे असते. त्यामध्ये काही कालावधी जातो. ५ हजेरीपटांच्या बाबतीत चार आठवड्यांपेक्षा जास्त विलंब झाला. यंत्रणेने दिनांक २६-९-२००५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पतमर्यादा मागितली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनाकडे दिनांक ६-१०-२००५ रोजी मागणी केली होती. शासनाकडून जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक २७-१०-२००५ रोजी पैसे मिळाले. जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २९-१०-२००५ रोजी यंत्रणेला पैसे दिलेले आहेत आणि मजुरीचे वाटप दिनांक ३१-१०-२००५ रोजी झालेले आहे. यामध्ये पैसे नव्हते म्हणून मजुरीचे वाटप झालेले नाही असे दिसते. यामध्ये शासनाची सुध्दा चूक नाही. कारण शासनाकडून दर तिमाहीला पैसे दिले जातात. थोडा उशीर झालेले चार हजेरीपट आहेत. दि. २७-११-२००५ ते दि. ५-१२-२००५ या कालावधीतील कामाच्या संदर्भात ३१ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. दि. १७-१-२००६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने यंत्रणेला पैसे दिले आणि ते दि. ३०-१-२००६ रोजी मजुरांना अदा करण्यात आले आहेत. या संदर्भात श्री. एस.एस.बोरसे, तालुका कृषी अधिकारी, शिरपूर आणि श्री. एन.जे. नांदुरकर, उपविभागीय कृषी अधिकारी, धुळे यांना जबाबदार धरण्यात आले असून त्यांना ताकीद देण्यात आली आहे. कलेक्टर ऑफीसचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे पतमर्यादेची मागणी उशीरा आली त्यामुळे वाटपाला उशीर झालेला आहे. या चारही हजेरीपटांची एकूण रक्कम १ लाख ३० हजार ३०० रुपये इतकी आहे.त्यावर निधी उशिराने प्राप्त होतो याचा अर्थ काय ? यंत्रणेकडून जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी आल्यानंतर जिल्हाधिकारी ती शासनाकडे सादर करतात. पण शासनामध्ये अशी पध्दत आहे की, दर तीन महिन्याने एक वेळा निधी देण्यात येतो. त्यामुळे पैसे मिळण्यास उशीर होतो. तीन महिने निधी येत नसेल तर खालची एजन्सी मजुरांचे पेमेंट कशा पध्दतीने करणार ? अशी समितीने विचारणा करता ही आधीची योजना आहे. दि. १-४-२००८ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यात केंद्र शासनाची नवीन योजना लागू झालेली असून या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून डायरेक्ट कलेक्टर, बीडीओ, ग्रामपंचायत यांना ॲडव्हान्समध्ये दोन ते तीन लाख रुपये देण्यात येतात. त्यामधून ते ही कामे घेतात. अशी माहिती समितीला देण्यात आली.

**अभिप्राय व शिफारस :**

रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या मजुरीचे वाटप १५ दिवसात केले पाहिजे असे शासनाचे नियम आहेत. परंतु या जिल्ह्यातील काही यंत्रणांनी तीन, ते चार आठवड्यांपेक्षा जास्त विलंबाने मजुरांच्या मजुरीचे वाटप केले आहे. मजुरांच्या मजुरीचे वाटप विलंबाने करणे ही गंभीर बाब आहे. आता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली आहे. त्या योजनेच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर जिल्हाधिकारी यांच्याकडे निधी उपलब्ध झालेला आहे. तसेच या योजनेच्या बाबतीत जिल्हाधिकारी आणि संबंधीत यंत्रणांना बरेच अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे भविष्यात तरी मजुरांचे वाटप वेळेवर करण्यात आले पाहिजे. यामुळे ज्या यंत्रणेकडून मजुरांच्या मजुरीचे वाटप विलंबाने केले गेले त्या संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्याकडून त्यासंबंधी जिल्हाधिकारी यांनी स्पष्टीकरण मागितले पाहिजे. मजुरांच्या मजुरीचे वाटप भविष्यात विलंबाने होणार नाही या गोष्टीकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालावे. मजुरी मिळण्यास ३ आठवडे, ४ आठवडे विलंब लागला तर रोजगार हमीच्या कामावर मजूर येणार नाहीत. शेतमजूर सुध्दा रोज सायंकाळी त्याच्या मालकाकडे त्या दिवसाची रोजी मागतो आणि मजुरी दिली नाही तर उद्या कामावर

येणार नाही असे सांगतो. आपण जर वेळेवर मजुरी दिली नाही तर आपल्याकडे मजूर येणार नाहीत व मजुरांना नियमानुसार विहित वेळेत मजुरीचे वाटप केले पाहिजे असे समितीचे मत आहे. मजुरी वाटपास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांना सक्त ताकीद देण्याशिवाय कोणतीही कारवाई करण्यात आली नाही असे दिसून येते. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात प्रतिकूल शेरे नोंदविणे आवश्यक आहे असे समितीला वाटते. **यासंदर्भात समिती अशी शिफारस करीत आहे. मजुरी वाटपास विलंब लावणाऱ्या सर्व कार्यन्वयीन यंत्रणाची यंत्रणानिहाय चौकशी करुन संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी व त्याची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात घेण्यात यावी व त्याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला ३ महिन्यात सादर करण्यात यावा.**

## (२) अपूर्ण कामे

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक १५ व १६ जानेवारी, २००९ रोजी झालेल्या धुळे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेनुसार जिल्ह्यातील यंत्रणानिहाय अपूर्ण कामांमध्ये १ ते ५ वर्षातील १६ कामे, ६ ते १० वर्षातील १० कामे व १० वर्षावरील ७१ कामे अशी एकूण ९७ कामे अपूर्ण असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. (परिशिष्ट १ पहावे)

यासंदर्भात समितीने विचारणा केली की, धुळे जिल्ह्यात अपूर्ण कामांची एकूण संख्या ९७ एवढी आहे. कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर यांच्याकडे ३८ कामे अपूर्ण आहेत. सदरहू कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत ? त्यावर वन विभागाच्या अडचणीमुळे ३० कामे अपूर्ण आहेत आणि सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी ७ कामे अपूर्ण राहिलेली आहेत व १ काम एक ते पाच वर्षातील आहे, ते काम देखील अपूर्ण आहे. त्याचप्रमाणे ३० कामे वन विभागाच्या अडचणीमुळे अपूर्ण आहेत. त्यासंबंधीचे काही प्रस्ताव वन विभागाकडे व काही प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आले आहेत. सदरहू प्रस्ताव वेगवेगळ्या स्तरावर प्रलंबित आहेत. पाझर तलाव, नामपूर, ता. साक्री हे काम अपूर्ण आहे. सदर पाझर तलावाच्या कामास १९८७ या वर्षी सुरुवात झाली होती आणि ते काम १९८८ मध्ये वन हरकतीमुळे बंद पडले आहे. या पाझर तलावाच्या कामासाठी वन विभागाची ६.६३ हेक्टर जमीन लागणार आहे. या तलावाच्या कामाचे मूळ अंदाजपत्रक ५.८० लाख रुपयांचे होते. या कामावर ४.७१ लाख रुपये खर्च झालेला आहे. १९८८ या वर्षी वन विभागाने हरकत घेतल्यामुळे सदर काम बंद करण्यात आले आहे. १९८६ मध्ये धुळे जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. दुष्काळी परिस्थितीत मजुरांना कामे मिळावीत म्हणून त्यावेळी या जिल्ह्यात रोहयोच्या माध्यमातून बरीच कामे हाती घेण्यात आली होती. त्यातील हे एक काम आहे. या पाझर तलावाच्या कामात वन जमीन जात आहे त्यामुळे वन विभागाकडून १९८८ मध्ये हरकत घेण्यात आली . वन जमिनीवर जुन्या कामांच्या बाबतीत केंद्रीय वन विभागाची परवानगी घेतल्याशिवाय कामे सुरु करु नयेत अशा प्रकारचे आदेश देण्यात आले आहेत. या कामाच्या प्रस्तावास वन विभागाकडून अद्याप परवानगी मिळालेली नाही अशी माहिती देण्यात आली.

**पाझर तलाव मुडावद, ता. शिंदखेडा :**

समितीने विचारणा केली की, पाझर तलाव, मुडावद, ता. शिंदखेडा या कामाची सद्य:स्थिती काय आहे ? त्यावर मुडावद पाझर तलावाचे काम डिसेंबर, २००५ मध्ये सुरु केले होते. या पाझर तलावाच्या घळ भरणीचे काम मे, २००६ मध्ये पूर्ण झाले आहे. सदर अपूर्ण काम पूर्ण झाले होते. परंतु ऑगस्ट २००६ मध्ये या जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. त्या अतिवृष्टीमुळे तापी नदीला महापूर आला होता. त्या महापुरामुळे सदर तलावाच्या सांडव्यास धोका पोहोचला. या तलावाच्या सांडव्याचे काम काही प्रमाणात वाहून गेले आहे. सदरहू कामाच्या परिसरात चुनखडीची जमीन आहे. त्यामुळे आता सांडव्याचा पाया खोल घ्यावा लागणार आहे. सदरहू सांडव्याचे काम करण्यासाठी रिव्हाईज एस्टीमेट करण्यात आले असून त्यास मान्यता घेण्याची प्रक्रिया चालू आहे. या कामावर आतापर्यंत ११.६९ लाख रुपये खर्च झालेला आहे अशी माहिती मिळाली, त्यावर एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करुन सांडव्याचे काम वाहून गेले. याचा अर्थ सदर सांडव्याचे काम व्यवस्थित झाले नसावे असा आमचा संशय आहे. याबाबतीत काय म्हणणे आहे ? अशी समितीने विचारणा केली असता सदर पाझर तलावाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या विभागात अतिवृष्टी झाली व त्यात सांडव्याचे काम वाहून गेले आहे अशी वस्तुस्थिती आहे. सांडव्याच्या परिसरात चुनखडीची जमीन असल्यामुळे सांडव्याच्या कामाचा पाया खोल घ्यावा लागणार आहे. त्यामुळे खर्चाच्या रकमेत वाढ होणार आहे. महापुरामध्ये सांडव्याच्या बाहेरची भींत पूर्णपणे वाहून गेली. शिरपूर तालुक्यात तापी नदीच्या जवळील काही भागात कठीण खडकाची जमीन मिळत नाही. ते गाव तापी नदीच्या जवळ आहे. तापी नदीच्या जवळ असलेल्या भूभागात कठीण खडकाच्या जमिनी नाहीत. या पाझर तलावाच्या ठिकाणी चुनखडीची जमीन लागल्यामुळे सांडव्याचे कामासाठी पाया खोल घ्यावा लागणार आहे. सदरहू सांडव्याच्या कामाची सुधारित किंमत आता ८ लाख रुपये एवढी झालेली आहे. अशी माहिती देण्यात आली त्यावर समितीने विचारणा केली की, सदर पाझर तलावाचे सांडव्याचे काम २००६ मध्ये वाहून गेले. आता २००९ हे वर्ष सुरु झालेले आहे. जवळपास अडीच वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. अजूनही सुधारित अंदाजपत्रकास मान्यता का मिळाली नाही ? सदर कामाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता घेण्यासंबंधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे कधी पाठविला ? त्यावर सदरहू पाझर तलावाच्या सांडव्याच्या कामाबाबतचा सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला होता. परंतु तो प्रस्ताव परिपूर्ण नव्हता, त्यात काही त्रुटी होत्या त्यांची पूर्तता करण्यासाठी तो प्रस्ताव यंत्रणेकडे परत आला. सांडव्याच्या कामाच्या ठिकाणी चुनखडी लागली आहे म्हणून तेथे पाया अधिक खोल घ्यावा लागणार आहे. त्या खोलीचा आधार घेऊन त्या कामाचे रिव्हाईज एस्टीमेट तयार करुन ते पुन्हा मान्यतेसाठी सादर करावे लागणार आहे. सदर पाझर तलावाची साईट फिजीबल आहे. फक्त सांडव्याच्या भिंतीच्या कामासाठी पुरेसा पाया मिळालेला नाही. म्हणून सदर कामाचे नव्याने रिव्हाईज एस्टीमेट करावे लागणार आहे. अशी माहिती देण्यात आली.

**पाझर तलाव मुडावद, ता. शिंदखेडा, अभिप्राय व शिफारस :**

पाझर तलाव मुडावद, ता. शिंदखेडा या तलावाचे काम डिसेंबर, २००५ मध्ये सुरु झाले होते व घळभरणीचे काम मे, २००६ मध्ये पूर्ण झाले. मात्र ऑगस्ट, २००६ मध्ये जिल्ह्यातील अतिवृष्टीने तापी नदीच्या पुरामुळे या तलावाच्या सांडव्याचे काम वाहून गेले. सदरहू कामाच्या परिसरात

चुनखडीची जमीन असल्याने पुन्हा सांडवा बांधताना त्याचा पाया खोल घेण्यात यावा असे समितीला वाटते. या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक करण्यात आले असून त्यास मान्यता घेण्याची प्रक्रिया चालू असल्याचे समितीला सांगण्यात आले. सदर सांडव्याचे काम २००६ मध्ये वाहून जाऊन २००९ या वर्षापर्यंतसुध्दा सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली नव्हती याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

**याबाबत समिती अशी शिफारस करीत आहे की, या कामाच्या प्रस्तावाची जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणी करावी व या तलावाच्या कामांचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यास जबाबदार असणाऱ्या तसेच या अंदाजपत्रकाच्या मंजुरीस विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

**पाझर तलाव, चिमठाणे :**

पाझर तलाव, चिमठाणे या कामासंदर्भात समितीने जिल्हा बैठकीच्या वेळी विचारणा केली की, सदर काम हे २००२-०३ या वर्षातील असून हे काम जिल्हा परिषद, लघु सिंचन विभागाचे आहे. सदर पाझर तलावाच्या कामास २००३ मध्ये सुरुवात झाली होती आणि सदरहू काम २००४ मध्ये बंद झाले आहे. सदरहू काम मोठ्या प्रमाणात अपूर्ण आहे. या पाझर तलावाच्या ठिकाणी एका बाजूला बंधाऱ्याची भींत बांधली गेली आहे. दुसऱ्या बाजूस कोणत्याही प्रकारचे काम करण्यात आलेले नाही. २००४ ते २००७ पर्यंत संयुक्त मोजणी अभावी काम बंद होते. या कामाची तीन वर्षे संयुक्त मोजणी झाली नाही. सदर कामाची संयुक्त मोजणी तीन वर्षाच्या कालावधीत का होऊ शकली नाही व या गोष्टीस कोण अधिकारी जबाबदार आहेत ? त्यावर २००४ ते २००७ पर्यंत या कामाची संयुक्त मोजणीचे काम झाले नाही ही गोष्ट खरी आहे. पूर्वीचे कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २३ डिसेंबर, २००६ रोजी सदर कामास भेट दिली होती. त्यांनी उप अभियंता यांना सदर कामाचे मोजमाप घेण्यासाठी निदेश दिले. उप अभियंता यांनी दिनांक ३ एप्रिल, २००७ रोजी कामाचे मोजमाप केले असता त्यात तफावत आढळून आली. त्यामुळे सदरहू कामाची संयुक्त मोजणी करण्यात यावी अशा प्रकारचे आदेश अधीक्षक अभियंता यांनी दिनांक २ ऑगस्ट, २००७ रोजी दिले होते. त्यांच्या आदेशाप्रमाणे सदरहू कामाची संयुक्त मोजणी झालेली आहे. या कामावर आतापर्यंत ५ लाख २४ हजार रुपये खर्च झालेला आहे. सदर कामाची संयुक्त मोजणी झालेली आहे. अधीक्षक अभियंता यांच्याकडून निलंबन निधी निश्चित झाल्यानंतर सदरहू कामाचे रिव्हाईज एस्टिमेट तयार करण्यात येऊन सदरहू काम पूर्ण करण्यात येईल. निलंबन निधी निश्चित झाल्यानंतर सदर कामाचे रिव्हाईज एस्टीमेट तयार करुन ते जिल्हाधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. जिल्हाधिकारी यांची मान्यता मिळाल्यानंतर सदर काम पूर्ण करुन घेण्यात येईल. लघु पाटबंधारे, स्थानिक स्तर यांच्याकडून अशा कामांचे रिव्हाईज एस्टीमेट केले जाते अशी माहिती देण्यात आली. यासंदर्भात दिनांक ४ ऑगस्ट, २०१० रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीमध्ये समितीने चिमठाणे पाझर तलावाची सद्य:स्थिती विचारली असता समितीला माहिती देण्यात आली की, सन २००२ मध्ये या कामाला मंजुरी मिळाली व सन २००३-२००४ मध्ये काम सुरु करण्यात आले. या कामावर ५ लाख २४ हजार रुपये खर्च करण्यात आले. डिसेंबर, २००६ मध्ये कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद यांनी या कामाला भेट दिल्यानंतर त्यांना कामाच्या मोजमापामध्ये तफावत आढळून आली. त्यासंबंधीचे रिपोर्टींग करुन त्यांनी या कामाबाबत चौकशी करण्यासाठी अधीक्षक अभियंत्यांकडे शिफारस केली. त्यानंतर अधीक्षक अभियंता यांनी संयुक्त मोजणीसाठी चौकशी समिती नेमली. संयुक्त समितीचा अहवाल एक वर्षानंतर आल्यानंतर कामाच्या मोजमापामध्ये काहीही तफावत नाही असे सिध्द झाले, व निलंबन निधी निरंक असल्याचे सांगण्यात आले. श्री. नेरकर व श्री. गाडे, या उप अभियंत्यांना संयुक्त मोजणी करुन अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले होते. परंतु त्यांच्याकडून संयुक्त मोजणी अहवाल उशिरा सादर करण्यात आल्याबद्दल त्यांच्याविरुध्द कारवाई प्रस्तावित केली आहे. संयुक्त मोजणी अहवाल वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करता आले नाही. संयुक्त मोजणी पूर्ण झाल्यानंतर अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे, मंडळ, नाशिक यांनी दिनांक १७ एप्रिल, २०१० च्या पत्रान्वये निलंबन निधी "निरंक" असल्याचे प्रमाणित केले आहे. समितीची साक्ष लागल्यानंतर अंदाजपत्रक तयार केले काय अशी विचारणा केली असता, संयुक्त मोजणी समिती, दिनांक २ ऑगस्ट, २००७ रोजी नेमण्यात आली होती. समितीने दिनांक २७ जुलै, २००८ रोजी अहवाल दिला. तो अहवाल अपूर्ण होता, म्हणून अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाने परत पाठविला. यामधील त्रुटींची पूर्तता केल्यानंतर निलंबन निधी "निरंक" असल्याचे म्हटले. संयुक्त मोजणी समितीमध्ये श्री. नेरकर, उप अभियंता व श्री. गाडे, उप अभियंता (अतिरिक्त कार्यभार) होते. त्यापैकी श्री. गाडे हे मयत झाले असून श्री. नेरकर यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली आहे. कार्यकारी अभियंत्यांनी भेट दिल्यानंतर कामाच्या मोजमापामध्ये तफावत असल्याचे आढळून आले. मूळ काम आणि प्रत्यक्षात असलेले काम यामध्ये तफावत दिसल्यामुळे त्याबाबत चौकशी करण्याची शिफारस करण्यात आली. त्यानंतर संयुक्त मोजणी समिती नेमण्यात आली. याबाबत वेळोवेळी अधीक्षक अभियंता यांना स्मरणपत्रे दिलेली आहेत. चौकशी समिती नेमल्यानंतर व चौकशी सुरु असतांना काम पूर्ण करता येत नाही. चौकशी समिती नेमल्यानंतर त्यांना वेळोवेळी स्मरणपत्रे दिले आहे. यावर संयुक्त मोजणी करावयास पाहिजे होती. संयुक्त मोजणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करता येत होते, त्यासाठी त्यांना वेळोवेळी स्मरणपत्र दिले होते. परंतु आता निलंबन निधी निश्चित झाला असून हे काम तातडीने पूर्ण करण्यात येईल. त्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता घ्यावी लागेल. सुधारीत अंदाजपत्रक मंजूर झाल्यानंतर एक वर्षात काम पूर्ण होईल. सुधारित अंदाजपत्रक अधिक्षक अभियंता यांच्या स्तरावर होते अशी माहिती देण्यात आली.

**चिमठाणे पाझर तलाव-अभिप्राय व शिफारस :**

पाझर तलाव, चिमठाणे हे काम सन २००२-२००३ या वर्षातील असून हे काम जिल्हा परिषद, लघु सिंचन विभागाचे आहे. सदर पाझर तलावाच्या कामास २००३ मध्ये सुरुवात झाली आणि हे काम २००४ मध्ये बंद झाले हे काम मोठ्या प्रमाणात अपूर्ण आहे. सन २००४ ते २००७ पर्यंत

संयुक्त मोजणी अभावी काम बंद होते या कामाची तीन वर्ष संयुक्त मोजणी होऊ शकली नाही याचे समितीला सखेद आश्चर्य वाटते व ही अतिशय गंभीर बाब आहे. त्याचप्रमाणे तलावाची साईट चुकीची निवडलेली आहे असे समितीचे मत आहे. त्याचप्रमाणे या तलावाच्या कामाचा संयुक्त मोजणी अहवाल वेळेवर प्राप्त न झाल्याने सुधारीत अंदाजपत्रक तयार करता आले नाही व समितीची साक्षीची बैठक निश्चित झाल्यावर या तलावाबाबतचा निलंबन निधी "निरंक" असल्याचे अधीक्षक अभियंत्यांनी प्रमाणित केल्याचे दिसते. **याबाबत समिती अशी शिफारस करते की, या कामाची संयुक्त मोजणी करण्यास विलंब लावणाऱ्या तसेच या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यास विलंब लावणाऱ्या संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला ३ महिन्यांत सादर करण्यात यावा. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील इतर सर्व अपूर्ण कामांची सुधारीत अंदाजपत्रके सर्व संबंधित यंत्रणांनी जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावीत त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यांनीसुध्दा सदरहू प्रस्तावांना लवकरात लवकर मान्यता देऊन जिल्ह्यातील अपूर्ण कामे पूर्ण करावीत व त्याबाबतचा अहवाल समितीला ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## (३) सुधारीत अंदाजपत्रक

समितीच्या दिनांक १५ व १६ जानेवारी, २००९ रोजी झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीपुस्तीकेतील माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, का.अ. धुळे पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता, रोहयो (सार्वजनिक बांधकाम) विभाग या यंत्रणांनी त्यांच्याकडे असलेल्या कामांबाबतची सुधारित अंदाजपत्रके शासनास विलंबाने सादर करण्याची कारणे काय ? कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, स्थानिक स्तर विभाग यांच्याकडील सुधारित अंदाजपत्रके शासन स्तरावर ३ आणि यंत्रणा स्तरावर २ प्रलंबित आहेत. याबाबत काय परिस्थिती आहे ? त्यावर सगळी अंदाजपत्रके शासनाकडे सादर केली होती. त्यातील काही अंदाजपत्रके शासनाने मंजूर करुन पाठविली. मध्यंतरी दर वाढल्यामुळे काही अंदाजपत्रके परत आणून सुधारित करुन पुन्हा सादर करण्यात येणार आहे. पाझर तलाव पिंपरखेडा-२ या कामाच्या विशेष दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करुन पाठविण्यास सांगितले आहे. हे काम पूर्ण झालेले आहे. सुधारित अंदाजपत्रक पाठविले होते पण छाननी केल्यानंतर असे लक्षात आले आहे की, काम पूर्ण झालेले आहे आणि दोन वर्षानंतर तलाव फुटलेला होता. त्या विशेष दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करुन पाठवावे असे त्यांना कळविले आहे. दिनांक २३ मे, २००७ ला.अंदाजपत्रक परत सादर केलेले आहे. आता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये नव्याने अंदाजपत्रक सादर करण्यात येणार आहे. मागच्या वर्षी परत सादर केले होते. आता शासन स्तरावरुन अशा सूचना आलेल्या आहेत की, जी अपूर्ण कामे आहेत ती महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये वर्ग करता येतील काय ते पडताळून पहावे. तसे करता येत असेल तर प्रस्ताव पाठवून मान्यता घ्यावी. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु झालेली आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये कामे वर्ग करुन पूर्ण करता येतील काय याची पडताळणी करीत आहोत. त्या माध्यमातून कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. या ५ कामांपैकी उर्वरित २ कामांमध्ये निलंबन निधी आहे आणि २ कामांमध्ये अनियमितता आहे. जी अंदाजपत्रके परत आलेली आहेत ती महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये नव्याने सादर करण्यात येणार आहे. अशी माहिती देण्यात आली. त्यावर समितीने विचारणा केली की, दोन अंदाजपत्रके शासनाकडून परत आलेली आहेत. पाझर तलाव चिवटीबारी या कामाचे मूळ अंदाजपत्रक ६ लाख ८३ हजार रुपयांचे होते. सुधारित अंदाज पत्रकाची रक्कम ३५ लाख १९ हजार रुपये आहे. यामध्ये निलंबन निधी असल्यामुळे प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे या प्रकल्पाची किंमत सहापट वाढलेली आहे. निलंबन निधी बाजूला ठेऊन काम पूर्ण कसे होईल या दृष्टीकोनातून विचार करण्याची आवश्यकता आहे. हे १९७८ चे काम आहे. त्यासाठी प्रशासकीय मान्यता घ्यावयाची राहिलेली आहे. अशी माहिती समितीला देण्यात आली.

**अभिप्राय व शिफारस :**

कामांच्या सुधारित अंदाजपत्रकासंदर्भात जी अपूर्ण कामे आहेत ती महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये वर्ग करता येतील काय व तसे करता येत असल्यास तशा स्वरुपाचा प्रस्ताव तयार करण्यात यावा असे समितीचे मत आहे. निलंबन निधीमुळे प्रशासकीय मान्यता प्रलंबित असेल तर त्याबाबत शासन स्तरावर विचार करुन विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता देऊन कामे पूर्ण करता येतील. तसेच अंदाजपत्रके शासनाकडून त्रुटी काढून परत येणार नाहीत या पध्दतीने तपासणी करुन यंत्रणांनी शासनाकडे पाठविली पाहिजेत व आयुक्त कार्यालय पातळीवरच या बाबी स्पष्ट झाल्या तर शासन स्तरावरुन अंदाजपत्रक परत येणार नाही असे समितीचे मत आहे.

**याबाबत समिती अशी शिफारस करीत आहे की, सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता न घेतल्याने बरीच कामे अपूर्ण आहेत सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यासंबंधी विभागीय पातळीवर अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत ते प्रस्ताव निकाली काढण्यासाठी आयुक्त कार्यालयाने जिल्हाधिकारी यांचे समन्वयाने सुधारीत अंदाजपत्रकातील त्रुटी दूर करुन अपूर्ण कामे पूर्ण करण्याचा निश्चित कार्यक्रम आखून कामे पूर्ण करावीत व त्याबाबतचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा.**

## (४) गैरव्यवहाराची प्रकरणे

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक १६ जानेवारी, २००९ रोजी धुळे येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीवरुन दिनांक ३० सप्टेंबर, २००८ अखेरपर्यंत गैरव्यवहारांची एकूण ३५ प्रकरणे प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनाला आहे. (परिशिष्ट २ पहावे) गैरव्यवहाराच्या प्रलंबित प्रकरणांबाबत समितीने विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग यांच्याकडे १० कार्यकारी अभियंता, लघु सिंचन बिभाग, जि. प. यांच्याकडे १०, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, धुळे यांच्याकडे ५, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जि.प.यांच्याकडे ६, उप वनसंरक्षक, धुळे यांच्याकडे २, कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग १, कार्यकारी अभियंता, रोहयो (सा.बां.) यांच्याकडे १ अशी एकूण ३५ गैरव्यवहाराची प्रकरणे यंत्रणांकडे प्रलंबित आहेत. सदर प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे ? सदर प्रकरणे निकाली काढण्यासाठी विलंब लागण्याची कारणे काय आहेत. यावर गैरव्यवहाराची एकूण ३५ प्रकरणे प्रलंबित असून शासन स्तरावर ८ प्रकरणे प्रलंबित आहेत. कार्यकारी यंत्रणेच्या स्तरावर २० प्रकरणे प्रलंबित आहेत. विभागीय चौकशी अधिकारी स्तरावर ७ प्रकरणे प्रलंबित आहेत, अशी माहिती देण्यात आली.

त्यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) वि., धुळे या यंत्रणेच्या पाझर तलाव, खुडाणे, ता.साक्री या कामात झालेल्या गैरव्यवहारात गाभा कवच भरावाचे कामात जास्त परिणाम नोंदवून प्रत्यक्षात काम कमी करुन गैरव्यवहार झालेला आहे. या कामात १,१४,७५१ रुपये एवढी रक्कम गुंतलेली आहे. या कामावर बराच मोठा गैरव्यवहार झालेला दिसतो आहे. अशी समितीने विचारणा केली. त्यावर सदरहू गैरव्यवहाराची चौकशी प्रगतीपथावर असून ती चौकशी आता अंतिम टप्प्यात आहे. सदरहू प्रकरणाची चौकशी विभागीय स्तरावर होत आहे. या प्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणी चौकशी अधिकारी नेमण्यात आला असून त्यांच्याकडून चौकशीचे काम चालू आहे. अशी माहिती देण्यात आली त्यावर सदर प्रकरण १९८७ या वर्षातील आहे. या प्रकरणात जवळपास २० वर्षाचा कालावधी होऊन गेला आहे. तरी देखील चौकशीचे प्रकरण अद्याप निकाली निघालेले नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. या प्रकरणी चौकशी अधिकारी कधी नेमण्यात आले अशी समितीने विचारणा केली त्यावर विभागीय आयुक्त कार्यालयाने सदर गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दिनांक २८.१.२००८ रोजी चौकशी अधिकारी नेमले आहेत. नियोजन विभागाने एकत्रित चौकशी करण्यासंबंधी विभागीय आयुक्त कार्यालयास दिनांक ६ जुलै, २००४ रोजी आदेश दिले आहेत. त्या आदेशाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयाने दिनांक २८.१.२००८ रोजी या प्रकरणी चौकशी अधिकारी नेमण्याचे आदेश काढले होते. याबाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, शासनाने एकत्रित चौकशी करण्याचे विभागीय आयुक्त कार्यालयास आदेश दिले होते. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयाने २००४ या वर्षी चौकशी अधिकारी नेमले होते. परंतु २००६ मध्ये चौकशी अधिकाऱ्यांची पदे व्यपगत झाल्यामुळे नव्याने चौकशी अधिकारी नेमण्याची कारवाई करावी लागली. त्यानंतर नव्याने कंत्राटी पध्दतीने चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक करावी लागली. सदरहू नेमणूक दिनांक २८.१.२००८ रोजी करण्यात आली आहे. पाझर तलाव, खुडाणे या कामात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने चौकशी अधिकारी दिनांक २८.१.२००८ रोजी नेमले आहेत. त्या अधिकाऱ्यांना सहा महिन्यांची मुदत दिली होती. या प्रकरणातील श्री.पी.एस.मराठे, उप विभागीय अधिकारी यांचे दिनांक १५.१२.९७ रोजी निधन झाले आहे. तसेच श्री.एस.बी.महाजन यांचे देखील दिनांक १९.१०.२००३ रोजी निधन झाले आहे. उर्वरित संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यासाठी श्री. मेश्राम, अपर संचालक यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. चौकशीचे काम प्रगतीत आहे. याप्रकरणी शासनाने २००४ मध्ये चौकशी आदेशित केली होती. त्या आदेशाच्या अनुषंगाने चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. परंतु मे, २००६ मध्ये चौकशी अधिकाऱ्यांची पदे व्यपगत झाली, त्यामुळे सदर प्रकरणाचे चौकशीचे काम अपूर्ण राहिले. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने जानेवारी, २००७ मध्ये पॅनलची यादी प्रसिध्द केली. त्यांनतर चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली. सदर प्रकरणी साक्ष नोंदवून घेण्याचे काम राहिले आहे. ते लवकरात लवकर पूर्ण करून घेण्यात यावे. असे आयुक्तालयाकडून चौकशी अधिकाऱ्यांना पत्र दिले जाईल. त्यावर समितीने विचारणा केली की., या कामाची सद्यःस्थिती काय आहे. त्यावर या प्रकरणी विभागीय चौकशीचे काम पूर्ण झाले आहे. या प्रकरणी श्री.जे.व्ही.पाटील यांचे विरुध्द विभागीय चौकशी करावी असे दिनांक १५ एप्रिल, २००९ रोजी शासनाने आदेशीत केले होते. त्या आदेशाप्रमाणे सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झालेली आहे. श्री.जे.व्ही.पाटील यांच्या दोन वेतनवाढ रोखण्यात आलेल्या आहेत. सदरहू निर्णयाच्या बाबतीत श्री.पाटील यांनी अपील अर्ज दाखल केला आहे. नियोजन विभागाच्या दिनांक २५.७.०२ रोजीच्या पत्रान्वये संबंधिताविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल व त्यासंबंधीचे अभिप्राय मागितले आहेत. सदरहू कारवाईचा अहवाल व तत्संबंधीचे अभिप्राय शासनास दिनांक २९.१.२००९ रोजी सादर करण्यात आले असून या प्रकरणाची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे. अशी माहिती देण्यात आली.

यानंतर समितीने पाझर तलाव, चिवटी बारी, ता.साक्री या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा केली. त्यावर या प्रकरणी चौकशी अधिकारी नेमले आहेत. चौकशीचे काम प्रगतीत आहे. सदर प्रकरणात शासनाकडील दिनांक १८.११.०६ च्या पत्रान्वये श्री.पी.एस.मराठे, उप विभागीय अभियंता, अ.शा.हाळकारे, शाखा अभियंता, श्री.ज.गो.सारंगधर, शाखा अभियंता, श्री.आर.डी.आहिरे, उप विभागीय अभियंता हे सेवानिवृत्त झाल्याने चौकशीतून वगळले आहे. उर्वरित संबंधित कर्मचारी यांचे विरुध्द चौकशीची कार्यवाही सुरु आहे. अशी माहिती देण्यात आली. येत्या ३ ते ४ महिन्यात चौकशीचे काम पूर्ण करण्यात येईल. अशी माहिती देण्यात आली. पुढे समितीने पाझर तलाव, दिवाणमळा, ता. धुळे हे काम १९८८ सालातले असून या कामाच्या गैरव्यवहारामध्ये ९४,८९१ रुपये गुंतले आहेत, याबाबत विचारणा करता या प्रकरणामध्ये मापन पुस्तक अधिक्षक अभियंता, नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे यांच्याकडून अप्राप्त आहे. आयुक्त कार्यालयाकडे पत्र प्राप्त झालेले आहे. मापन पुस्तकाचा शोध

घेतला परंतु ते सापडलेले नाही, अधिक्षक अभियंता, धुळे यांनी या संदर्भात दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी कार्यकारी अभियंत्यांना पत्र पाठविलेले आहे. याप्रकरणात संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाले आहे. दिवाणमळा या पाझर तलावाचे काम १९९८ नंतर ल.पा.स्थानिक स्तर यांच्याकडे हे काम वर्ग झालेले आहे. त्यांनी एम.बी.दिलेली आहे. कोणत्याही गैरव्यवहारातील प्रकरणात निलंबन निधी निश्चित झाल्याशिवाय ते प्रकरण पूर्ण करता येत नाही. या प्रकरणातील एम.बी.सादर झाले आहे किंवा नाही यासंदर्भात रिकंसाईल करुन आयुक्त कार्यालयामार्फत हे प्रकरण मार्गी लावण्यात येईल. अशी माहिती देण्यात आली.

समितीने दिनांक ४ ऑगस्ट, २०१० रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने गैरव्यवहारांच्या प्रकरणांची सद्यःस्थिती विचारता समितीला माहिती देण्यात आली की, गैरव्यवहाराची एकूण ३५ प्रकरणे आहेत ? ३५ प्रकरणांपैकी १४ प्रकरणे निकाली निघाली आहेत. २१ प्रकरणे प्रलंबित आहेत. यातील ७ प्रकरणे शासन स्तरावर आहेत, ११ प्रकरणे विभागीय स्तरावर आहेत. दोन प्रकरणे विभागीय चौकशी अधिकाऱ्यांच्या स्तरावर आहेत, एक प्रकरण संबंधित एजन्सीकडे प्रलंबित आहे. १४ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. नागझरी येथील शाखा अभियंता श्री. जे.व्ही पाटील हे दोषी आढळून आले आहेत. या प्रकरणात ३४,६६८ रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. त्यामुळे श्री. जे,व्ही. पाटील यांच्या दोन वेतनवाढी रोखण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे चिवटीबारी येथील प्रकरणात १९,४६३ रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. ही रक्कम श्री. पी.एन.देसले, शाखा अभियंता यांच्याकडून वसूल करण्यात आलेली आहे. त्यांची एक वेतनवाढ तीन वर्षासाठी रोखण्यात आलेली आहे. या प्रकरणातील श्री. मराठे व श्री. अहिरे हे सेवानिवृत्त झाले आहेत. त्याचप्रमाणे बेलसाणे यांच्या प्रकरणाची चौकशी झालेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :---**

जिल्हा बैठकीच्या वेळी गैरव्यवहाराची ३५ प्रकरणे प्रलंबित होती त्यातील १४ प्रकरणे निकाली निघाली असून २१ प्रकरणे प्रलंबित आहेत ७ प्रकरणे शासन स्तरावर, ११ प्रकरणे विभागीय आयुक्त स्तरावर व एक प्रकरण यंत्रणेकडे प्रलंबित असून सदरची प्रकरणे १९८६ पासूनची असून आता जवळपास २० वर्षांचा कालावधी होऊन गेला आहे तरी देखील प्रकरणे निकाली निघाली नाहीत ही अत्यंत गंभीर बाब आहे व याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होत आहे ही बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. विभागीय आयुक्त कार्यालय या प्रकरणाबाबत गंभीर नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. काही प्रकरणांमध्ये ७ ते ८ वर्षापासून चौकशीची प्रक्रीया सुरु आहे. चौकशीच्या प्रकरणांमध्ये १०-१० वर्ष निर्णय होत नाही. गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना अशाप्रकारे सांभाळून घेण्यात येत आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**लाखो रुपयांच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये दिरंगाई होत आहे. परंतु संबंधितांविरुध्द काहीच कारवाई होत नाही. ही बाब जिल्ह्याच्या दृष्टीने गंभीर आहे या प्रकरणांमध्ये आयुक्त कार्यालयाकडूनही विलंब होतो याबाबत समिती अशी शिफारस करते की, गैरव्यवहाराच्या प्रलंबित २१ प्रकरणांची चौकशी करण्यात यावी व प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याची कार्यवाही सुरु करण्यात यावी. त्याचप्रमाणे गैरव्यवहाराच्या प्रकरणातील रक्कम संबंधित अपचाऱ्यांकडून वसूल करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व ज्या यंत्रणांनी गैरव्यवहाराची प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवली आहेत त्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

## (५) जवाहर विहिर कार्यक्रम

समितीच्या दिनांक १६ जानेवारी, २००९ रोजी झालेल्या धुळे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तीकेनुसार धुळे जिल्ह्यामध्ये जवाहर विहिर कार्यक्रमाअंतर्गत सन १९८८-८९ ते सन २००८ अखेरपर्यंत ठरवून दिलेल्या ५९६१ या लक्षांकापैकी ५५२४ विहिरींना मंजुरी देण्यात आली असल्याचे, ४०७० विहिरी पूर्ण करण्यात आल्या असल्याचे, आणि ११७६ विहिरी अपूर्ण असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मंजूर विहिरींपैकी ११७६ विहिरी अपूर्ण आहेत. त्याची कारणे काय आहेत. यावर १९८८-८९ ते २००७-०८ या कालावधीतील या विहिरी आहेत. या योजनेतील लाभार्थी गरीब शेतकरी आहेत. अग्रिम स्तरावरील या विहिरी नाहीत. या विहिरीपैकी बऱ्याच विहिरी पूर्ण झाल्या आहेत. ४०७० पूर्ण आणि ११७६ अपूर्ण विहिरी आहेत. विहिरी पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांकडे पाठपुरावा करीत आहोत. यासंदर्भात दोन वर्षापासून मोहीम घेऊन अपूर्ण विहिरींची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नंतर काम वाढले तर काम रेंगाळते किंवा लाभार्थ्याने स्वत: काही खर्च केला नाही तर शासनाने दिलेल्या रकमेमध्ये विहिरीचे काम पुर्ण करु शकत नाही. या दोन कारणांमुळे विहिरींची कामे अपूर्ण राहतात. आता विहिरी वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यामुळे बऱ्याच विहिरी पूर्ण झालेल्या आहेत. ज्या विहिरी रद्द करण्यासारख्या आहेत त्या रद्द करुन ज्या विहिरी पूर्ण होण्यासारख्या आहेत त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्यांनी सर्व्हे केलेला आहे. ३६० विहिरींच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे की, या विहिरीपैकी ६४ विहिरीचे खोदकाम झालेले आहे. परंतु पाणी लागलेले नाही. १७१ विहिरींमध्ये पाणी लागले आहे परंतु बांधकाम झालेले नाही. १२५ विहिरी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या आहेत. बाकीच्या ८१६ विहिरींच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे की, ४८ विहिरींना पाणी लागले नाही आणि बांधकाम सुध्दा झालेले नाही. ५३३ विहिरींना पाणी लागले आहे. परंतु बांधकाम शिल्लक आहे. ७ विहिरींच्या बाबतीत अग्रीम घेतलेला नाही. आणि कामही केलेले नाही. १४६ विहिरी भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत. काही विहिरी रद्द करावयाच्या आहेत अशी माहिती समितीला देण्यात आली.

समितीने दिनांक ४ ऑगस्ट, २०१० रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीला माहिती देण्यात आली की, रोजगार हमी योजना समितीने भेट दिली त्यावेळी ११७६ विहिरी अपूर्ण होत्या. त्यापैकी ६७० विहिरी पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. ज्या विहिरी अपूर्ण आहेत त्यापैकी ९० टक्के विहीरी १४ महिन्यांच्या कालावधीत लाभार्थ्यांनी काम न केल्यामुळे रद्द करण्यात आलेल्या आहेत. ४१६ लाभार्थ्यांना दहा हजार रुपये ॲडव्हान्स रक्कम देण्यात आलेली आहे. परंतु सदर लाभार्थ्यांनी काम न केल्यामुळे त्या विहीरी बंद करण्यात आलेल्या आहेत. ७/१२ च्या उताऱ्यावर बोजा चढविण्याची कार्यवाही सुरु आहे. सुरुवातीला एक लाख रुपये देण्यात येत होते. यामध्ये वाढ करुन १,९०,००० रुपयांचा प्रस्ताव तयार करुन पाठविण्यात आला आहे. ही वाढ जास्त आहे असा आक्षेप घेण्यात आलेला आहे. एक लाख रुपयांवरुन दीड लाख रुपये करण्याची मागणी करावयास पाहिजे होती. १,९०,००० रुपयांची मागणी का करण्यात आली अशी विचारणा करण्यात आलेली आहे अशी माहिती देण्यात आली.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**धुळे जिल्ह्यात अद्यापही ५०६ विहिरी अपूर्ण असल्याचे दिसून येते. बऱ्याचशा विहिरी शासनाने मंजूर केलेल्या अनुदानातून पूर्ण होत नसल्याने रद्द कराव्या लागलेल्या आहेत. ज्या विहिरी पूर्ण म्हणून दाखविल्या आहेत त्यामध्ये पाणी नाही या विहिरींचा व्यास मोठा व खोली कमी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विहिरींना चांगले पाणी लागण्यासाठी विहिरीची खोली जास्त घेऊन व्यास कमी असावा असे समितीचे मत आहे. त्यामुळे विहिरीला पाणी लागून पाणी टिकून राहील. ज्या विहिरींची कामे अपूर्ण आहेत, त्या विहिरी कोणत्या स्तरावर अपूर्ण आहेत ते पाहून विहिरी पूर्ण करण्यात याव्यात. विहिरी पूर्ण होणार नसतील तर त्या रद्द करण्यात याव्यात. लाभार्थ्यांना विहिरी पूर्ण करण्यासाठी व प्रोत्साहित करण्यासाठी जवाहर विहिरींना जो निधी देण्यात येतो त्यामध्ये वाढ करण्यासाठी विभागाने प्रस्ताव करावा. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## (६) भूसंपादनाचा मोबदला

दिनांक १५ व १६ जानेवारी, २००९ रोजी धुळे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तीकेनुसार समितीने विचारणा केली की, पाझर तलावाच्या कामासाठी २०-२० वर्षापूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत त्या शेतकऱ्यांना अद्यापही त्यांच्या जमिनीचा मोबदला दिला गेलेला नाही. २० वर्षापूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. त्यावेळी त्यांच्या जमिनीचे भाव कमी असतील तर आज त्यांच्या जमिनीचे भाव मोठया प्रमाणात वाढले आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी १५ ते २० वर्षापूर्वी संपादित केल्या आहेत परंतु त्यांना अद्यापही भूसंपादनाचा मोबदला दिला गेला नाही, त्या शेतकऱ्यांच्या जमिनीला आजचा दर दिला जाईल काय ? तसेच शेतकऱ्यांना त्यांचा भूसंपादनाचा मोबदला देण्यासाठी फार विलंब होत असल्यामुळे त्यांना व्याज देखील देण्यात येईल काय? त्यावर रोजगार हमी योजनेच्या कामासाठी आवश्यक असणारी खाजगी जमीन वाटाघाटीने घेण्यात येते आणि त्यानंतर त्या जमिनीवर कामे सुरु करण्यासंबंधीचे प्रस्ताव तयार केले जातात. सर्वांच्या समक्ष खाजगी जमिनीची संयुक्त मोजणी केली जाते. त्यानंतर भूसपादनाची प्रक्रिया चालू केली जाते. भूसंपादनाचा प्रस्ताव संबंधित यंत्रणेकडून भूसंपादन अधिकाऱ्यांकडे येतो. भूसंपादन अधिकाऱ्यांकडून तो प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला जातो. त्यानंतर जिल्हाधिकारी भूसंपादनासंबंधीचे आदेश काढतात. संबंधित यंत्रणेकडून भूसंपादनाचे प्रस्ताव येण्यास बराच विलंब होत असतो. सदर प्रस्ताव संबंधित यंत्रणांनी वेळेवर दिले तर त्या संबंधीची कार्यवाही लवकर होणेस निश्चितपणे मदत होईल. भूसंपादनाचे प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्यांकडून भूसंपादन अधिकारी यांच्याकडे येतात, त्यानंतर भूसंपादन अधिकाऱ्यांकडून सदरहू प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे येतात. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाच्या " ५२-अ " प्रमाणे कार्यवाही सुरु होते. त्यानंतर निवड प्रक्रिया सुरु होते. रोहयोच्या कामासाठी लागणारी खाजगी जमीन वाटाघाटी करुन ताब्यात घेण्यात येते. ती संपूर्ण जमीन ताब्यात आल्यांनतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येते. सदर कामामुळे शेतकऱ्यांचा फायदा होणार असतो, त्यामुळे शेतकरी आपल्या जमिनी संबंधीची संमतीपत्रे देत असतात. जमीन संपादनाच्या बाबतीत कलम ४ ची नोटीस ज्या दिवशी प्रसिध्द झाली असेल, त्या दिवशी जमिनीचा जो दर होता, त्या दराने मोबदला दिला जातो. त्यावेळी जास्तीत जास्त जो दर असेल त्या दराने मोबदला दिला जातो. संपादित केलेली जमीन गावाच्या जवळ असेल तर त्या गावात जमिनीचा जो दर असतो त्याप्रमाणे मोबदल्याची रक्कम अदा केली जाते. सदर जमीन जर इंटेरिअरमध्ये असेल तर त्यासाठी थोडा कमी दर दिला जातो. शासनाच्या नियमाप्रमाणे तीन वर्षात निवाडा घोषित करणे अपेक्षित आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर एखाद्या पाझर तलावासाठी १९९२ मध्ये जमीन संपादित केली असेल तर त्या जमिनीच्या निवाडा १९९५ मध्ये घोषित करणे आवश्यक आहे . सदरहू जमीन संपादनाच्या बाबतीत कलम ४ ची नोटीस प्रसिध्द होते, त्या दिवशी त्या परिसरात जमिनीचा जो भाव असतो तो भाव शेतकऱ्यांना दिला जातो. पाच वर्षाच्या कालावधीनंतर मोबदला देण्यास विलंब होत असेल तर १२ टक्के व्याजासह मोबदल्याची रक्कम शेतकऱ्यास दिली जाते. अशी माहिती देण्यात आली.

**अभिप्राय व शिफारशी :-**

पाझर तलावांच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करुन २० वर्षाचा कालावधी होऊनही शेतकऱ्यांना त्यांच्या भूसंपादनाचा मोबदला दिला गेलेला नाही असे समितीच्या निदर्शनास आले आहे. यंत्रणांकडून जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यास विलंब लावण्यात येतो. त्यानंतर भूसंपादन अधिकाऱ्याकडून विलंबाने प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले जातात व नंतर विलंबाने जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन भूसंपादनाच्या प्रस्तावाच्या बाबतीत कार्यवाही सुरु होते, ही अतिशय गंभीर बाब आहे. भूसंपादनाच्या मोबदल्याच्या प्रस्तावाच्या बाबतीत मुळात संबंधित यंत्रणेकडून दुर्लक्ष केले जाते असे समितीचे स्पष्ट मत आहे. जिल्ह्यात भूसंपादनाची २० वर्षापासूनची प्रकरणे आहेत. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता त्यांची संमतीपत्रे घेण्यात येतात असे समितीचे मत आहे.

**याबाबत समिती अशी शिफारस करते की, यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसोबत वाटाघाटी करुन त्यानंतरच जमिनी संपादित कराव्यात तसेच वाटाघाटी करताना गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच साक्षीदार यांना उपस्थित ठेवण्याची देखील व्यवस्था करण्यात यावी. बाजार भावानुसार वा शासनाच्या रेडी रेकनरप्रमाणे शेतकऱ्यांच्या जमीनी घेण्यात याव्यात तसेच शेतकऱ्यांना मोबदला दिल्याशिवाय त्या जमीनीवर कामास सुरुवात करु नये व यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा. ज्या शेतकऱ्यांना मोबदला दिला गेला नसेल त्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी पाठपुरावा करुन त्या शेतकऱ्यांना ताबडतोब मोबदल्याचा लाभ देण्यात यावा व शेतकऱ्यांना जमीनींचा मोबदला तात्काळ कसा दिला जाईल या गोष्टीकडे जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जातीने लक्ष घालावे व भूसंपादनाची विविध स्तरावरील प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढावीत व त्यासंबंधिचा अहवाल समितीला ३ महिन्यात सादर करण्यात यावा.**

# परिशिष्ट-एक

## अपूर्ण कामे

एचबी-२२७१-७

प्रश्न क्रमांक : ९ | अपूर्ण कामे (दि. ३०/९/२००८ अखेर)

## गोषवारा

| अ.क्र. | यंत्रणेचे नांव | एकुण अपुर्ण कामे | | | मजूरां अभावी | | | अकुशल काम अपूर्ण | | | वन हरकत | | | सुधारित अंदाजपत्रका अभावी / सु.प्र.मा. अभावी | | | जमीन मालक हरकत / घाळणेवर | | | संयुक्त मोजणी अभावी | | | इतर कारणे (भौतिक दृष्टया काम पूर्ण /कुशल निधी अभावी अपूर्ण/कुशल काम प्रगतीत) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील | १ ते ५ वर्षातील | ६ ते १० वर्षातील | १० वर्षा वरील |
| १ | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्त.) विभाग, धुळे | १ | - | ३७ | - | - | - | - | - | - | - | - | ३० | - | - | ७ | - | - | - | - | - | - | १ | - | - |
| २ | कार्यकारी अभियंता, ल.सि.विभाग, (जि.प.) धुळे | २ | ३ | ३० | - | - | - | - | - | २ | - | - | ११ | - | १ | ६ | - | - | १ | १ | - | - | १ | २ | १० |
| ३ | कार्यकारी अभियंता, धुळे पाटबंधारे विभाग, धुळे | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धुळे | - | २ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | - | - | - | - | - | - | - |
| ५ | कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग धुळे | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ६ | कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (सा.बां.) विभाग धुळे | ४ | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | - | - | - | - | - | ३ | - | - |
| ७ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (जि.प.) धुळे | ९ | ५ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | - | - | - | - | ८ | ५ | - |
| | एकूण | १६ | १० | ७१ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ४१ | १ | १ | १७ | १ | २ | १ | १ | ० | ० | १३ | ७ | १० |
| | एकूण एकंदर | ९७ | | | ० | | | २ | | | ४१ | | | १९ | | | ४ | | | १ | | | ३० | | |

प्रश्न क्रमांक : ९ अपूर्ण कामे ( दिनांक ३०/९/२००८ अखेर ) जिल्हा - धुळे

काम सुरु झाल्यापासून अपूर्ण असलेल्या कामाबाबतची माहिती.

१ ते ५ वर्षे व ६ ते १० आणि १० वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटलेल्या कामाची माहिती.

तालुकानिहाय व यंत्रणानिहाय (रुपये लाखांत)

| अ.क्र | यंत्रणानिहाय अपूर्ण कामांची संख्या | अपूर्ण कामाचे नांव व कामाचा प्रकार. (पाझर तलाव, गाव तलाव, मालगुजारी तलाव, रस्ते, वनीकरण, मृदसंधारण इत्यादी.) | मूळ अंदाजपत्रकानुसार कामाची किंमत | मूळ अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाल्याच्या तारखा (उदा. तां.मा.,प्र.मा. तारीख) | काम सुरु झाल्याची तारीख व काम बंद असल्यास त्याची तारीख (उदा.का.सु. तारीख, का. बंद तारीख ) | कामे बंद वा अपूर्ण असण्याची कारणे (उदा.भूसंपादना अभावी, मजूराअभावी, वनजमिन हरकत इत्यादी) | आतापर्यंत कामावर झालेला एकूण खर्च | अपूर्ण कामे कालबध्द कार्यक्रम आखून तो अग्रक्रमाने पूर्ण करण्याबाबत केलेली अथवा करावयाची उपाययोजना व त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| **कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्त.) विभाग, धुळे** | | | | | | | | |
| **१ ते ५ वर्षातील** | | | | | | | | |
| | ता.शिंदखेडा | | | | | | | |
| १ | १ | पा.त.मुडावद | १८.०८ | १४.५.०४ २७.१२.०४ | १८.१२.०५ | अकुशल काम पूर्ण | ११.६९ | कुशल काम प्रगतीत रक्कम रु ६.३९ लक्ष |
| **६ ते १० वर्षातील** | | | | | | | | |
| निरंक | | | | | | | | |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **१० वर्षापेक्षा जास्त** | | | | |
| | ता.धुळे. | | | | | | | | |
| २ | २ | पा.त.पिपरखेडा नं.२ | २.१३<br>१७.४० | २९.३.८४ | ७.४.८४ | २०.४.८४<br>२५.५.८५ | दि. २९.६.८७ रोजी फुटल्यामुळे (सु.प्र.मा. अभावी) | कामावर २.८८<br>वनजमीनसाठी २.६०<br>एकूण ५.४८ | सुधा.अंदा. म.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडून दि. १८.१.०७ रोजी प्रशा. मान्यतेसाठी शासनास सादर. शासन स्तरावर प्रशासकिय मान्यता देण्याचे काम प्रगतीत. रक्कम रु. ११.९२ लक्ष |
| ३ | ३ | पा.त.पुरमेपाडा नं.३ | २.९४ | १९.४.८३ | ३०.४.८३ | २.५.८३<br>३०.४.८८ | वनहरकती मुळे बंद | ३.४२ | तत्वत: मंजूर हमी पत्र तयार करुन सादर करणेत येत आहे. |
| ४ | ४ | पा.त.कन्हेरवाडी | २.४५ | ४.१.८५ | ८.३.८५ | ११.५.८५<br>१५.७.८५ | वनहरकती मुळे बंद | १.६० | वनभंगाची टिपणी म.मुख्य वनसंरक्षक, धुळे यांची ३/०२ केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांना सादर |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ५ | पा.त.पुरमेपाडा (हत्तीसोंड) | ४.०४ | २.६:८५ | ९.८.८५ | ४.९.८५<br>५.३.८६ | वनहरकती मुळे बंद | २.४९ | वनभंगाची टिपणी २९.५.०१ अन्वये महसूल व वन विभागास सादर. वनभंगाचा अहवाल अ.अ.ल.पा.(स्था.स्तर)मं. नाशिक यांचे कडून दिनाक ३०.१०.०७ च्या पत्रान्वये वनविभाग मंत्रालय मुंबई यांना सादर. |
| ६ | ६ | पा.त.सावळीतांडा | ३.२७ | २०.३.९१ | ४.५.९१ | १०.५.९१<br>२६.६.९१ | वनहरकती मुळे बंद | ०.७५ | वनभंगाची टिपणी २९.५.०१ अन्वये महसूल व वन विभागास सादर. |
| ७ | ७ | पा.त.हिंगणे | २.९९ | ८.५.८५ | ९.१०.८५ | ९.११:८५<br>२३.१.८६ | वनहरकती मुळे बंद | ०.५६ | ४:१४ चा अहवाल २७.१.०५ रोजी केंद्रस्थ अधि., नागपूर यांना फेर सादर, आवश्यक ते प्रमाणपत्र ३०.६.०५ रोजी वन विभागास सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ता.शिंदखेडा | | | | | | | | |
| ८ | ८ | पा.त.चोरविहीर | ४.९४<br>११.९६ | ४.९.७८<br>१५.१२.०४ | ४.१०.७९<br>-- | ५.११.७९<br>३०.९.८४ | सु.प्र.मा.अभावी | ११.९६ | काम पुर्ण तथापि सुधारीत अंदाजपत्रकावर शासन स्तरावर घेतलेल्या शे-यांची शेरे पुर्तता करणेसाठी प्रस्ताव यंत्रणेस दि २६.२.०८ रोजी परत. |
| | ता. साक्री | | | | | | | | |
| ९ | ९ | पा.त.नांदर्खी | ४.९७<br>९.८८<br>२४.७४<br>५३.९० | ११.१.७९<br>२०.३.८५<br>८.४.०२<br>१४.१०.०५ | २१.१.७९<br>८.४.८५<br>३१.१२.०३<br>- | १४.२.७९<br>३१.३.८५ | सु.प्र.मा.अभावी | २३.८७ | सु.सुधारीत अंदाजपत्रक प्रशासकिय मान्यतेसाठी शासनास सादर दि.१८.१.०७ शासन स्तरावर प्रशासकिय मान्यता देण्याचे काम प्रगतीत. रक्कम रु ३०.०३ लक्ष |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | १० | पा.त.छडवेल कोर्डे (सितेची पावले) | ४.६०<br>३९.९७ | ४.५.८३<br>२४.११.०६ | १०.५.८३ | ७.९.८३<br>१.१०.८४ | सु.प्र.मा.अभावी | ८.१६ | सुधारीत अंदाजपत्रक म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडुन दि. २१.५.२००७ रोजी शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर. शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्याचे काम प्रगतीत. रुपये ३१.८१ लक्ष |
| ११ | ११ | पा.त.धवळीविहीर | ४.९०<br>९.४८<br>३०.१७ | ८१-८२<br>९०-९१<br>१८.६.०१ | १६.६.८७<br>३०.४.९० | १३.७.८७<br>१.१०.०१ | सु.प्र.मा.अभावी | ३०.१७ | काम पुर्ण तथापि सुधारीत अंदाजपत्रक म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडुन दि. १८.१.२००७ रोजी प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर. शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्याचे काम प्रगतीत |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | १२ | पा.त.चिवटीबारी | ६.८३<br>३५.१९ | १६.९.७८<br>२९.९.०६ | २५.९.७८ | २२.१.७९<br>१८.५.९९ | सु.प्र.मा.अभावी | ३८.५८ | काम पुंर्ण तथापि सुधारीत अंदाजपत्रकावर शासन स्तरावर घेतलेल्या शे यांची पुर्ततेसाठी यंत्रणेस दि.८.५.०८ रोजी परत. |
| १३ | १३ | पा.त.गुलतारा-२ | २.८६<br>३५.१३ | २२.४.८३<br>२४.११.०६ | १७.५.८३ | १९८३<br>१९८४ | सु.प्र.मा.अभावी | कामावर ०.०१<br>वनजमीनीसाठी ७.३६<br>एकूण ७.३७ | म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडून सु.प्र.मासाठी शासनास सादर दि.२०.१.०७. शासन स्तरावर प्रशासकिय मान्यता देण्याचे काम प्रगतीत. रक्कम रु. २७.७६ लक्ष |
| १४ | १४ | पा.त.शिरसोले-३ | २.९० | २१.३.८५ | २६.४.८५ | १०.६.८५<br>२१.८.८५ | वनहरकतीमुळे बंद | ०.५१ | वनभंगाची सविस्तर टिपणी दि.३०.४.०४ नुसार वनसंरक्षक, धुळे यांना सादर.वनविभागाची सविस्तर टिपणी या विभागाचे दिनांक ७.४.०७ च्या पत्रान्वये उपवनसंरक्षक धुळे वनविभाग धुळे यांना सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | १५ | पा.त.नागपूर-४ | ५.८० | १३.१०.८६ | २०.१२.८६ | २४.४.८७<br>२०.३.८८ | वनहरकतीमुळे बंद | ४.७१ | १. पुर्नविचारार्थ वनभंगाचा अहवाल सात प्रतीत दि.२४.२.०५ रोजी पश्चिम वन विभाग, धुळे यांना सादर. आवश्यक ते प्रमाणपत्र दि. ३.६.०५ रोजी वनविभागास सादर केले आहे.२.वनभंगाचा अहवाल म.अ.अ.ल.पा.(स्था.स्तर) मं.नाशिक यांचे दि.३०.१०.०६ च्या पत्रान्वये वनविभाग मंत्रालय मुंबई यांना सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १६ | पा.त.महिर-२ | ५.३२ | १९.९.८६ | २३.१२.८६ | २०.४.८७<br>१५.५.८९ | वनहरकतीमुळे बंद | ५.७७ | १.वनभंगाची टिपणी केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेमार्फत महसूल व वनविभागास दि. १६.६.०१ रोजी सादर करणेत आली आहे. २.वनभंगाचा अहवालम.<br>अ.अ.ल.पा.(स्था.स्तर)<br>मं.नाशिक यांचे दि.३०.१०.०६ च्या पत्रान्वये वनविभाग मंत्रालय मुंबई यांना सादर. |
| १७ | १७ | पा.त.आयने-२ | ६.६९ | २४.९.८५ | ११.१०.८५ | १२.१२.८६<br>२०.५.८८ | वनहरकतीमुळे बंद | २.८३ | वनभंगाची टिपणी केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेमार्फत महसूल व वनविभागास दि. १६.६.०१ रोजी सादर करणेत आली आहे. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | १८ | पा.त.राजसबाई शेवाळी-४ | २.८६ | १८.८.८६ | १८.१२.८६ | २१.४.८७<br>७.८.९० | वनहरकतीमुळे बंद | ०.४७ | अद्ययावत ४:१४ चा अहवाल दि. २८.७.०५ रोजी केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांना सादर. आवश्यक ते प्रमाणपत्र दि.३.६.०५ रोजी वनविभागास सादर. |
| १९ | १९ | पा.त.छावडीपाडा | ३.०८ | २०.४.८४ | २२.५.८४ | २०.३.८५<br>२०.४.८५ | वनहरकतीमुळे बंद | ०.४४ | वनभंगाची सविस्तर टिपणी दि. ४.८.०१ व २९.१०.०१ अन्वये महसूल व वन विभागास सादर.वनभंगाचा अहवाल म.अ.अ.ल.पा.(स्था.स्तर) मं. नाशिक यांचे दि.३०.१०.०६ च्या पत्रान्वये वनविभाग मंत्रालय मुंबई यांना सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २० | पा.त.गुकशेवाड | ४.२१ | ८.९.८२ | ११.११.८२ | २०.१.८३<br>२५.५.८३ | वनहरकतीमुळे बंद | ४.३३ | वनभंगाची सविस्तर टिपणी दि. १६.६.०१ अन्वये महसूल व वन विभागास सादर.२.वनभंगाचा अहवाल म.अ.अ.ल.पा. (स्था.स्तर) मं.नाशिक यांचे दि.३०.१०.०६ च्या पत्रान्वये वनविभाग मंत्रालय मुंबई यांना सादर. |
| २१ | २१ | पा.त.म्हसदी-२ | ३.९४ | १०.५.८० | १५.७.८० | १.३.८१<br>२५.१२.८१ | वनहरकतीमुळे बंद | ३.४१ | वनभंगाची सविस्तर टिपणी दि. १६.६.०१ अन्वये महसूल व वन विभागास सादर. |
| २२ | २२ | पा.त.जांभोरे-२ | ९.८० | १०.११.८६ | २४.१२.८६ | ३/८७<br>१०/८७ | वनहरकतीमुळे बंद | २.३२ | तत्वतः मंजूर. पर्यायी वनीकरणाच्या रकमा भरणा केल्या. हमीपत्र दि. १५.९.०५ रोजी वनविभागास सादर. |
| २३ | २३ | पा.त.राजसबाई शेवाळी | ३.०१ | ५.३.८५ | ६.६.८५ | १२.६.८५<br>१८.८.८५ | वनहरकतीमुळे बंद | ०.१५ | ४:१४ चा अहवाल केंद्रस्थ अधि. नागपूर यांना दि. १२.६.०५ रोजी फेर सादर. |

**ता.शिरपुर**

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २४ | पा.त.बोमल्यापाडा | ६.९०<br>९.९० | ४.८.८३ | १३.१०.८३ | २३.५.८४<br>२१.२.८५ | वनहरकतीमुळे बंद | १०.०२ | वनप्रस्ताव का.अ.,ल.पा.वि.धुळे यांचे कडून दि.२८.८.८५ च्या पत्रान्वये वनविभागास सादर. |
| २५ | २५ | पा.त.वरझडी | ३.३७<br>५.६९ | ६.३.८२ | १७.३.८२ | २१.११.८२<br>५.६.८६ | वनहरकतीमुळे बंद | ५.३७ | ४:१४ चा अहवाल पुर्नविचारार्थ मुख्य वन संरक्षक, धुळे मार्फत केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांना सादर. |
| २६ | २६ | पा.त.महादेव (दोंदवाड) | ३.३७<br>९.३६ | ६.२.८१ | १७.३.८२ | ९.११.८२<br>८.५.८६ | वनहरकतीमुळे बंद | ९.८१ | प्रस्ताव म.केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडून वन मंत्रालय भोपाळ यांना दि.५.१०.२००० मध्ये सादर. केंद्र शासनाकडे प्रलंबित. |
| २७ | २७ | पा.त.नवीन बुडकी | ४.४२<br>५.४० | २९.७.८५ | ९.८.८५ | ११/८५<br>६/८७ | वनहरकतीमुळे बंद | ५.१९ | वनप्रस्ताव का.अ., ल.पा.वि.धुळे यांचे दि.२७.९.८५ च्या पत्रान्वये वनविभागास सादर. |
| २८ | २८ | पा.त.खंबाळे (पिंप-या) | ६.२२ | २३.४.८३ | २८.८.८३ | १०.१०.८६<br>२१.५.८७ | वनहरकतीमुळे बंद | ५.५७ | केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे पत्र दि.२९.५.०१ अन्वये ४:१४ चा अहवाल महसुल व वन विभागास सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | २९ | पा.त.साम-या-१ | ४.४१ | ५.८.८५ | ७.८.८५ | २१.१.८६<br>१६.३.८७ | वनहरकतीमुळे बंद | २.८६ | केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे पत्र दि.२९.५.०१ अन्वये ४:१४ चा अहवाल महसुल व वन विभागास सादर. |
| ३० | ३० | पा.त.खंबाळे-२ | २.७७ | ७.४.८१ | १४.४.८३ | २४.१२.८३<br>३१.३.८४ | वनहरकतीमुळे बंद | २.४२ | केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे पत्र दि.२९.५.०१ अन्वये ४:१४ चा अहवाल महसुल व वन विभागास सादर. |
| ३१ | ३१ | पा.त.खैरखुटी | ८.६१ | २.२.८३ | १७.२.८३ | २३.१.८४<br>२३.१.८६ | वनहरकतीमुळे बंद | ६.७६ | केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे पत्र दि.२९.५.०१ अन्वये ४:१४ चा अहवाल महसुल व वन विभागास सादर. |
| ३२ | ३२ | पा.त.बोमल्याचौकी | ५.०२ | ३१.५.८५ | २.८.८५ | १५.१.८५<br>२५.६.८६ | वनहरकतीमुळे बंद | १.३७ | म. मुख्य वनसंरक्षक, धुळे यांचे पत्र दि.२९.१.०५ अन्वये ४:१४ चा अहवाल केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांना सादर. |
| ३३ | ३३ | पा.त.खंबाळे-५ | ५.०६ | २९.८.८३ | १६.१.८३ | २४.१.८५<br>२०.१२.८५ | वनहरकतीमुळे बंद | ०.६६ | तत्वतः मंजूर. पर्यायी वनीकरण रक्कम भरणा केली. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | ३४ | प.त.मोईटी | ४.७९ | १५.७.८५ | ३.८.८५ | २०.११.८५<br>१९.१.८७ | जनहरकतींमुळे बंद | ३.४५ | केंद्र शासनाने नाकारलेला प्रस्ताव पुन्हा मुक्त करणेसाठी केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी दि. २९.३.०५ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. |
| ३५ | ३५ | पा.त.वक्कवाडवाडा | ६.२७ | ४.१०.८५ | १७.१०.८५ | २७.१०.८५<br>२१.१.८६ | जनहरकतींमुळे बंद | ०.३१ | केंद्र शासनाने नाकारलेला प्रस्ताव पुन्हा मुक्त करणेसाठी केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी दि. २९.३.०५ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. |
| ३६ | ३६ | ना.त.हिंगण्यावाडा | ३.२३ | १५.७.८५ | ३.८.८५ | २०.१०.८५<br>१५.४.८८ | जनहरकतींमुळे बंद | १.६३ | म.मुख्य वनसंरक्षक, धुळे यांनी वनमंत्रालयाच्या सहमतीने दि.२६.८.०५ अन्वये केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांना सादर. |
| ३७ | ३७ | पा.त.दवचापाड | ८.६५ | १३.५.८६ | २८.५.८६ | १.६.८६<br>१५.६.८७ | वनहक्कांमुळे बंद | ६.५२ | म.मुख्य वनसंरक्षक, धुळे यांचे पत्र दि.८.९.०५ अन्वये ४:१४ चा अहवाल केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांना सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | ३८ | पा.त.चाकडू | ४.७१ | २९.७.८५ | १८.८.८५ | ६.६.८६<br>१५.६.८७ | वनहरकतीमुळे बंद | २.९० | वनसंवर्धन अधिनियम १९८० चे कलम ४:१४ अन्वये पुनर्विचारार्थ अहवाल दि. २५.२.०४ रोजी वनविभाग उत्तर शहादा यांना सादर. |
| कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग (जि.प.) धुळे | | | | | | | | | |
| १ ते ५ वर्षातील | | | | | | | | | |
| ता. शिंदखेडा | | | | | | | | | |
| ३९ | १ | प.त.चिमठाणे | १४.४२ | २०.७.०२ | २१.१०.०२ | १.५.०३ | संयुक्त मोजणी अभावी | ५.२४ | संयुक्त मोजणी पूर्ण दि. २७/११/०७, अहवाल अप्राप्त. रक्कम रु. २.१८ लक्ष |
| ४० | २ | प.त.शेवाडे | १६.३२ | १०.६.०२ | २२.२.०३ | २४.४.०४ | काम पूर्ण | ११.५३ | काम पूर्ण. पूर्णत्वाचा दाखला बाकी. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **६ ते १० वर्षातील** | | | | | |
| | **ता. धुळे** | | | | | | | | |
| ४१ | ३ | पा.त.निकुंभे | १२.६७<br>२६.९३ | २०००-०१<br>२००६-०७ | १२.३.०१ | ३.६.०१<br>१३.५.०२ | सु.प्र.मा. अप्राप्त | १६.५४ | सुधारित अंदाजपत्रक व त्रास मध्ये पूर्तता करून सादर दि. ३/६/०८ शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्याचे काम प्रगतीत. खर्च रु. १२.३९ लक्ष |
| | **ता. साक्री** | | | | | | | | |
| ४२ | ४ | पा.त.शेवाळी<br>(मेंढ-पलाट) | २.८०<br>३.२१ | २०००-०१<br>२००६-०२ | १६.४.०१ | ५.३.०२<br>६/२००२<br>- | अकुशल काम पूर्ण. | २.७६ | कुशल काम बाकी. खर्च रु. ०.५५ लक्ष |
| | **ता. शिंदखेडा** | | | | | | | | |
| ४३ | ५ | पा.त.साळवे | ८.२१<br>१२.४४ | २०१.२८<br>१०.१.०२ | ३०.१.९९<br>३१.५.०१ | ६.६१.०२ | अकुशल काम पूर्ण | १० १९ | कुशल काम बाकी खर्च रु. २.२५ लक्ष |
| | | | | **१० वर्षा पेक्षा जास्त** | | | | | |
| | **ता. धुळे** | | | | | | | | |
| ४४ | ६ | पा.त.लळींग | ३.०० | ८५-८६ | १६.८.८५ | २५.१२.८५<br>२.२.८६ | वन कायद्यामुळे बंद | ०.३५ | ४.२४ चा अहवाल दि.२४.८.२००० रोजी वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४५ | ७ | ना.त.सापटी | २.३२ | ८४-८५ | ३/८५ | २७.११.८५ १.८.८६ | वन हरकतींमुळे बंद | ०.६७ | ४:१४ चा अहवाल दि.२५.८.२००० रोजी वनसंरक्षक [illegible] यांना सादर. |
| ४६ | ८ | ना.त.सोनेवाडी | १.२५ | ८४-८५ | २८.१०.८५ | ८५/८६ | वन हरकतींमुळे बंद | ०.०१ | प्रस्ताव वनसंरक्षक नाशिक येथे सादर दि. २८/९/९५ |
| ४७ | ९ | पा.त.नंदाळे बु. | ४.२६ | ८४-८५ | १६.३.८५ | १६.४.८५ १८.७.८५ | वन हरकतींमुळे बंद | ०.६२ | तत्वतः मंजुरी प्राप्त दि. २९/२/२००२ |
| ४८ | १० | पा.त.अक्कलवे | २.५४ | ८४-८५ | ३१.५.८५ | १२.६.८५ ३१.१२.८७ | वन हरकतींमुळे बंद | ०.२९ | ४:१४ चा अहवाल दि.१८.८.२००० रोजी वनसंरक्षक अधिकारी नागपूर यांना सादर. |
| ४९ | ११ | पा.त.[illegible] | २.६७ | ८४-८५ | ८.३.८५ | १५.३.८५ २०.५.८५ | वन हरकतींमुळे बंद | ०.३५ | प्रस्ताव वनसंरक्षक मुंबई येथे सादर दि. [illegible] |
| ५० | १२ | पा.त.वडपाड | ५.११ | ८५-८६ | २७.३.८६ | ८५/८६ | वन हरकतींमुळे बंद | ०.२६ | ४:१४ चा अहवाल दि.२३.८.२००० रोजी वनसंरक्षक अधिकारी नागपूर यांना सादर. |
| ५१ | १३ | ना.त.छिंदलाट-१ | २.६२ ३६.६१ | ८२-८३ ०२-०३ | १५.२.८३ १९.४.०३ | १६.१.८४ १७.८.०३ | काम पूर्ण | १२.१८ | काम पूर्ण. कालवा कामाचे. [illegible] १२.४२ लक्ष |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५२ | १४ | पा.त. नांदे (शिरगी नाला) | २.०० <br> १२.२२ | ८२-८६ <br> ०६-०४ | १८.१२.८६ <br> २६.४.०४ | ५.४.८७ <br> १६.५.०८ | काम पूर्ण | ७.२४ | काम पूर्ण. कुशल कामाचे देयक बाकी. रक्कम रु. ५.६८ लक्ष |
| ५३ | १५ | पा.त.खंडलाव-१ | ३.२० <br> १६.५५ | ८१-८३ <br> ०१-०२ | ७.२.८२ <br> १८.१.०२ | २२.४.८३ <br> १७.८.०७ | काम पूर्ण | १०.३१ | काम पूर्ण. कुशल कामाचे देयक बाकी. रक्कम रु. ६.२४ लक्ष |
| ५४ | १६ | पा.त.नंदुर्ने (पिंपळा नाला) | ३.८२ | ८९-९० | ७.९.९० | २२.५.९२ <br> २५.६.९२ | जमीन मालक हरकत. | ०.२६ | वगळणेसाठी प्रस्तावित |
| ५५ | १७ | पा.त.नीरशोंखडे क्र ४ | ३.०४ <br> ६.०४ <br> २७.१५ | ८२-८३ <br> ८७-८८ <br> ०६-०७ | २०.१०.८२ <br> २५.३.८८ <br> -- | २०.१०.८२ <br> १९८८ <br> - | दि. १२.७.९२ रोजी फुटल्यामुळे (द.प्र.म. अभ्यावी) | ३.४८ | सुधारित अंदाजपत्रकास शासनाने घेतलेल्या शेऱ्यांची पूर्ततेसाठी दि. १३.५.०८ रोजी अंदाजपत्रक रक्कम रु. २०.६९ लक्ष |
| ५६ | १८ | प.त डवन्यापाडा | ४.६५ | ८६-८७ | ४/८७ | ५-८७ <br> ३-८२ | वन हरकतीमुळे बंद | २.८४ | ४:१८ चा अहवाल दि.२५.८.२००० रोजी केंद्रस्थ कार्यालयी नागपूर यांना सादर. |
| ५७ | १९ | पा.त.नान्हीरे | २.३२ <br> ८.०१ | ८८-८२ <br> २७.१२.०२ | १७.४.८९ <br> १३.१.०४ | ८२-२० | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. | २.४३ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. रक्कम रु. ५.६६ लक्ष |
| ५८ | २० | पा.त.वरखणे | ३.२१ <br> ७.७५ | ८५-८६ <br> २०००-०१ | २२.८.८६ <br> ५.४.०२ | २०.१.८७ | अकुशल काम पूर्ण. | ५.२१ | कुशल काम बाकीत रक्कम रु. १.८४ लक्ष |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५९ | २१ | पा.त.शेंन्बारे | १.८८ | ८७-८८ | २१.७.८८ | ८८-८९ | अनुशेष काम पूर्ण. | ३.४२ | कुशल काम अंतर्गत रक्कम रु. ५.३६ लक्ष |
| ६० | २२ | पा.त.गुल्तार-२ | १.७२<br>५.६७ | ८४-८५<br>०७-०८ | २६.४.८५ | ८५-८६ | सु.प्र.मा. कपाटे | ६.४१ | दूषित अंदाजपत्रकावर जिल्हाधिकारी कार्यालयाने घेतलेल्या शंकांचे दूर करून कार्यकारी यंत्रणेस दि.१.८.०७ रोजी ग्रा.प. यंत्रणेकडून दि.३.१२.०८ रोजी शेरे पूर्तता करून ग्रा.प. यंत्रणेचे शेरे पूर्तता अपूर्ण असल्याने त्यांस दि.११.११.०८ रोजी शेरेपूर्ततेसाठी पत्र. |
| ६१ | २३ | ग्रा.त.नाइते | २.२३<br>२.१७३ | ६०-६१<br>२०००-०१ | १६.१.६१<br>५.४.०१ | ३१-६२ | काम पूर्ण | ६.०५ | काम पूर्ण, कुशल कामाचे देयक बाकी रक्कम रु. १.६८ लक्ष |
| ६२ | २४ | पा.त.र.शेवाळी-५ | ३.९९ | ८४-८५ | १५.३.८५ | १७.६.८५<br>३०.१० ८५ | जन हरकतीमुळे बंद | ८.६५ | ४:१४ चा सहवाल दि.२५.८.२००० रोजी जिल्हा अधिकारी नागपूर यांना सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६३ | २५ | [illegible] आंब[illegible] | ४.५१<br>३७.३५ | ८६-८७<br>२२.३.०७ | १०.६.८७ | २६.६.८७<br>२८.६.८८ | लु.प्र.मा. [illegible] | २.८६ | सुधारित [illegible]<br>म.[illegible] ल.पा.<br>([illegible]) मंडळ, नाशिक<br>यांचेकडील [illegible]<br>[illegible] यांचेकडे<br>दि.४.१.०७ पासून [illegible]<br>रक्कम रु. २५.५१ लक्ष. |
| ६४ | २६ | [illegible] डोंगर[illegible] | २.४५<br>५.४६ | ९०-९१<br>०८-०२ | १५.२.९१ | ९१-९२ | लु.प्र. आवर्ती | ०.६८ | सुधारित अंदाजपत्रकावर<br>जिल्हाधिकारी कार्यालयाने<br>[illegible] शंकांची पूर्तता<br>दि.२४.११.०८ रोजी [illegible]<br>[illegible] रक्कम रु. ६.७८ लक्ष |
| ६५ | २७ | ना.त.[illegible]वाडी | ६.३९ | ८१-८२ | २९.८.८२ | ९०-९१ | काम पूर्ण | २.३८ | काम पूर्ण. कुशल कामांचे<br>[illegible] रु. २.९४ लक्ष |
| ६६ | २८ | [illegible] | २.२२<br>८.१७<br>१७.५३ | ८१-८२<br>२६.५.८१<br>९९-०० | १७.९.८२<br>३-९०<br>१५.६.०० | ८२-८३ | काम पूर्ण | १०.०३ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण.<br>[illegible] रु. ७.५० लक्ष |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६७ | २९ | पा.त. [illegible] | ९.४८<br>५५.३५ | ८१-८२<br>२०.१०.०८ | २३.९.८२ | ३/८/८४<br>१८/१२/८४ | सु.प्र.मा. [illegible] | १.५६ | सुधारित अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी कार्यालयाने [illegible] शेऱ्यांचे शेरे पूर्तता करणेसाठी यंत्रणेस दि.७.५.०७ रोजी परत. यंत्रणेकडून दि.२०.११.०८ रोजी शेरे पूर्तता करून प्राप्त यंत्रणेची शेरे पूर्तता अर्धअपूर्ण असल्याने यंत्रणेस दि.२४.११.०८ रोजी शेरेपूर्ततेसाठी परत. |
| ६८ | ३० | पा.त.नोहिंगे | ३.५८ | - | - | ३०.५.८२ | दि. १३.८.८२ रोजी फुटल्यामुळे (सु.क. [illegible]) | ३.८३ | सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे काम यंत्रणेकडे प्रगतीत. वन हद्दीतील काम. |
| | ता. [illegible] | | | | | | | | |
| ६९ | ३१ | गा.त.रेवाडी क्र. २ | १.६० | ८२-९० | १२.६.८८ | ८/१९/१९९० | काम पूर्ण | १.५२ | काम पूर्ण. पूर्णत्वाचा दाखला बाकी. |
| ७० | ३२ | [illegible]तोडा | २.००<br>६.६७ | ८६-८७<br>०६-०७ | २०.६.८७<br>२४.१.०७ | ८७-८८ | अकुशल काम अपूर्ण | ६.८१ | अकुशल काम अपूर्ण खर्च रु. ५.१६ लाख |
| ७१ | ३३ | [illegible] | २.७०<br>७.८६ | ८९-९०<br>०६-०७ | २१.७.९०<br>२४.१.०७ | ९०-९१ | अकुशल काम अपूर्ण | ०.६३ | अकुशल काम अपूर्ण खर्च रु. ६.४० लाख |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ता. शिरपूर | | | | | | | | |
| ७२ | ३४ | पा.त.खा.दोंदवाडे | ७.३२ | ३१.५.८५ | १४.८.८५ | ११.१२.८५<br>३१.३.८७ | वन हरकतीमुळे बंद | ७.४५ | ४:१४ चा अहवाल दि.९.८.२००० रोजी केंद्रस्थ अधिकारी नागपूर यांना सादर. |
| ७३ | ३५ | पा.त.लालमाती-३ | ९.२० | ८४-८५ | ३१.७.८५ | ६.८.८५<br>११-८९ | वन हरकतीमुळे बंद | ६.४७ | ४:१४ चा अहवाल दि.९.८.२००० रोजी केंद्रस्थ अधिकारी नागपूर यांना सादर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता, धुळे पाटबंधारे विभाग, धुळे** | | | | | | | | | |
| १० वर्षापेक्षा जास्त | | | | | | | | | |
| | ता. साक्री | | | | | | | | |
| ७४ | १ | ना.ब.किरवाडे, बाभलनदी नाला | ६.५९<br>११.७५ | ३०.७.८६<br>२३.१२.०३ | २२.८.८६<br>- | ८.११.८६<br>३१.३.९४ | सु.प्र.मा. अभावी | ११.७५ | काम पुर्ण तर्यांच सुधारित अंदाजपत्रक म.विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून शासनास दि. २.७.०८ रोजी सु.प्र.मा. साठी सादर. शासन स्तरावर प्रशासकिय मान्यता देण्याचे काम प्रगतीत. |
| **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धुळे** | | | | | | | | | |
| ६ ते १० वर्षातील | | | | | | | | | |
| | ता.धुळे | | | | | | | | |
| ७५ | १ | लळींग-१/१ सिमेंट बांध | ५.०० | १४.५.०२ | १७.५.०२ | २४.५.०२<br>३०.६.०२ | अकुशल काम पूर्ण | १.२४ | वगळणेसाठी प्रस्तावित. |
| | ता.शिंदखेडा | | | | | | | | |
| ७६ | २ | दलवेल-१/१ माती बांध | १.३४ | १६.५.०१ | २९.५.०१ | १.६.०१<br>२.६.०१ | शेतकरी हरकत | ०.०७ | वगळणेसाठी प्रस्तावित. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे** | | | | | | | | |
| | १० वर्षापेक्षा जास्त. | | | | | | | | |
| | ता. धुळे | | | | | | | | |
| ७७ | १ | वेंदू प्रकाशा रस्ता कि.मी. १०२/५०० ते ११८/०० | ६.९२<br>७.४७ | २/८७<br>१०/०७ | १५/५/८७<br>-- | ३१/१२/९०<br>-- | सू.प्र.मा. अभावी | ७.४७ | काम पूर्ण, तथापि सुधारित अंदाजपत्रकावर जिल्हाधिकारी कार्यालयाने घेतलेल्या त्रुटींची पूर्तता पूर्ततेसाठी संदर्भ दि.२८.११.०७ रोजी त्यांच्याकडून दि.२.३.०८ रोजी पूर्तता करून सा.बां. मं.का. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस दि.८.१२.०८ रोजी सादर. |
| | **कार्यकारी अभियंता, रोहयो (सा.बां.) विभाग, धुळे** | | | | | | | | |
| | १ ते ५ वर्षातील. | | | | | | | | |
| | ता. शिंदखेडा | | | | | | | | |
| ७८ | २ | १) पथारे ते ? रस्ता खडीकरण करणे ग्रामा ११० कि.मी. २/०० ते ५/०० | २४.७६ | २२.१.०३ | २६.४.०३ | २५.४.०३<br>१६.६.०४ | अकुशल काम सुरु. | ८.३२ | शेतकरी जमिन देण्यास तयार नाही. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७९ | २ | २) नवे साखरे ते नवे कोळदे रस्ता खडीकरण करणे कि.मी. ०/०० ते २/८०० | १९.२१ | १/१०३ | १६.४.०३ | १६.२.२४<br>७.५.०५ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. | ७.५४ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण, कुशल देयक बाकी रक्कम रु. ११.५५ लक्ष |
| ८० | ३ | ३) जुने कोळदे ते नवे कोळदे रस्त्याचे खडीकरण करणे (प्रजिमा८१) कि.मी. १/५०० ते ३/०० | १४.७२ | १/१०३ | १६.४.०३ | २०.२.२४<br>२०.७.०४ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. | ५.५९ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. कुशल देयक बाकी. रक्कम रु. १.९३ लक्ष |
| ८१ | ४ | ४) कन्हाळे ते शेंदवडा रस्त्याचे खडीकरण करणे कि.मी. ०/०० ते २/०० | १८.६१ | १/०३ | ४४.८३ | ८.५.०३<br>५/२००६ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण | ७.१४ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. कुशल देयक बाकी. रक्कम रु. ११.५५ लक्ष |
| | | | | | | १० वर्षापेक्षा जास्त. | | | |
| | ता. शिंदखेडा | | | | | | | | |
| ८२ | ५ | देगांव नेहरू | २.६६<br>५.९०<br>७.२७ | ७/८५<br>१/८६<br>- | २८.९.८५<br>८.७.८६<br>- | २५.१०.८५<br>११.३.९१<br>- | सु.प्र.मा. [illegible] | ७.२७ | काम पूर्ण [illegible]. सु-सुधारित अंदाजपत्रक वर जिल्हाधिकारी कार्यालयाने घेतलेल्या शेन्यांची पुर्तता करणे संदर्भात दि. २९/२/०८. रोजी पत्र. |

## कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धुळे

१ ते ५ वर्षातील

| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ता. धुळे | | | | | | | | |
| ८३ | १ | कुळ्थे ते नंदाळे रस्ता | १७.८२ | ८.१६.०६ | १.७.०९ | २.८.८२<br>१९.५.०३ | भौतिक दृष्ट्या काम पूर्ण. | ४.१२ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. खर्च रु. २.१० लक्ष |
| ८४ | २ | शिरुड ते तरवाडे रस्ता | ६.२१ | २०.१.०३ | २६.३.०३ | १३.८.०५<br>२७.८.०७ | भौतिक दृष्ट्या काम पूर्ण. | ५.११ | भौतिकदृष्ट्या काम पूर्ण. खर्च रु. १.१० लक्ष |
